CMYK




दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

▶ RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ४ थे ▶ अंक : ३१९ वा ▶ गुरुवार दि. १४ सप्टेंबर २०२३ ▶ किंमत : २ रु. ▶ पृष्ठे : ६



## न्यूज कॉलम

### पत्नीच्या जाचाने पतीची आत्महत्या

**नाशिक ।** चारित्र्यावर संशय घेतो म्हणून पत्नी आणि तिच्या नातेवाइकांनी छळ केल्याने पतीने आत्महत्या केल्याप्रकरणी पत्नीसह तिच्या नातेवाईकांच्या विरोधात अंबड पोलिसात आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. ज्योती जुंदरे (रा. डीजीपीनगर २) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, मुलगा शुभम जुंदरे (२८) याने पत्नीचे प्रेमसंबंध असल्याच्या संशयावरून पत्नीला विचारपूस केल्याने वेळोवेळी शारीरिक व मानसिक त्रास देत त्यास आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले.

### भरधाव ट्रक थेट दुकानात

**धुळे ।** भरधाव आयशर थेट दुकानात शिरल्याने तरुण गंभीर जखमी झाला. या प्रकरणी नरडाणा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. कलमाडी शिवारात हा विचित्र अपघात घडला. गौरव देवीदास पाटील (रा. पिंपरखेडा, ता. शिंदखेडा) असे जखमी तरुणाचे नाव आहे. तो मुंबई- आग्रा महामार्गावरील कलमाडी फाट्याजवळील रस्त्यालगत दुकानात होता. तेव्हा भरधाव आयशर (एचआर ४७, ई ९९२१) थेट दुकानात शिरला. त्या वेळी तरुणाच्या डाव्या पायावरून आयशर गेल्याने तो गंभीर जखमी झाला.

# विम्याची अग्रीम रक्कम देऊन दुष्काळ जाहिर करा : आ.बाळासाहेब थोरात

## अन्यथा महाराष्ट्रात आंदोलन ; भाजपा लोकशाहीचा गळा घोटत आहे

### धुळ्यात काँग्रेसच्या जनसंवाद यात्रेचा समारोप

**धुळे । प्रतिनिधी**

धुळे जिल्हयासह महाराष्ट्रात भीषण दुष्काळाची स्थिती असतांना केंद्राचे आणि राज्याचे सरकार सत्तेच्या राजकारणात गुंग आहे. सरकारने दुष्काळ जाहिर करुन शेतकर्यांच्या खात्यात २५ टक्के विम्याची अग्रीम रक्कम तत्काळ जमा करावी अन्यथा महाराष्ट्रभर आंदोलन केले जाईल असा इशारा काँग्रेसचे महाराष्ट्र विधी मंडळाचे नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी दिला.दरम्यान राज्यघटनेवर आघात केला जात असून लोकशाहीचा गळा घोटण्याचे काम भाजपा सरकार करीत असल्याचा घणाघातही यावेळी आ.थोरात यांनी यावेळी केला.

काँग्रेस पक्षार्फे राज्यात दि.३ सप्टेंबरपासून जनसंवाद पदयात्रा काढण्यात आली. या यात्रेचा धुळे जिल्हयाच्या समारोप महाराष्ट्र विधीमंडळाचे नेते माजी मंत्री आ.बाळासाहेब थोरात यांच्या अध्यक्षतेखाली दि.१३ सप्टेंबर रोजी दुलारी गार्डन नकाणे,धुळे येथे करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र काँग्रेसचे कार्याध्यक्ष आ.कुणाल पाटील, प्रदेश सरचिटणीस शरद आहेर, ज्येष्ठ पत्रकार निरंजन टकले, अश्विनी पाटील,माजी खा.बापू चौरे, माजी आ.वसंतराव सुर्यवंशी,काँग्रेस जिल्हाध्यक्ष शामकांत सनेर,शहराध्यक्ष डॉ.अनिल भामरे,प्रदेश सचिव युवराज करनकाळ हे उपस्थित होते. सभेत समारोपाप्रसंगी उपस्थित जनसमुदायापुढे बोलतांना विधीमंडळ नेते आ.बाळासाहेब थोरात यांनी भाजपाच्या धोरणांवर सडकून टीका केली. ते म्हणाले कि, भाजपा मूलभुत प्रश्नांकडे जनतेचे लक्ष जावू नये म्हणून नको त्या गोष्टींवर चर्चा मुद्दामहून घडवून आणत आहे.चंद्रयान यशस्वी झाले त्याबद्दल शास्त्रज्ञांचे मनापासून अभिनंदन केले पाहिजे मात्र शास्त्रज्ञ बाजूलाच राहिले पंतप्रधानच माध्यमांमध्ये जास्त दिसले. भारतात जी-२० परिषद घेतली. अवाढव्य खर्च केला तो सर्व खर्च जनतेच्या माथी मारला जाईल आणि त्यात महागाईची भर पडले. राज्य घटनेवर आणि जनतेच्या विचार स्वातंत्र्यांवर गदा आणून लोकशाहीचा गळा घोटण्याचे काम हे सरकार करीत आहे. राहुल गांधींच्या नेतृत्वात निघालेल्या भारत जोडो यात्रेने देशातील माणूस जोडला गेला.शेतकरी,विद्यार्थी,तरुण ,डॉक्टर,वकिल,सामाजिक कार्यकर्ते यांसह विविध क्षेत्रातील व्यक्तींना भेटून त्यांची मते व भावना जाणून घेतल्या. भारत जोडो यात्रा आणि जनसंवाद यात्रेमुळे लोकांमध्ये जागृती निर्माण झाली.दरम्यान आ.बाळासाहेब थोरात बोलतांना पुढे म्हणाले कि,आ. कुणाल पाटील यांच्या व्यक्तीमत्वात राज्यात संघटन करण्याचे कौशल्य आहे. त्यामुळे आता राज्यात कॉंग्रेस महाविकास आघाडीचे सरकार येणार आहे आणि आ.कुणाल पाटील यांची जबाबदारी आम्ही घेतो.असेही आ.थोरात यांनी शेवटी सांगितले.




**जिल्हयात भीषण दुष्काळ**

**समारोप सभेत बोलतांना आ.कुणाल पाटील यांनी सांगितल कि, भाजपाच्या दडपशाहीमुळे देशात लोकशाही संपुष्टात येत आहे. सरकारी यंत्रणांचा गैरवापर केला जात आहे. विचार स्वातंत्र्य राहिले नाही.भारत जोडो यात्रा आणि जनसंवाद यात्रेमुळे देशात बदल घडत आहे.त्यामुळे यापुढे राज्यात आणि देशात भाजपाचे सरकार येणार नाही. जिल्हयात भीषण दुष्काळ आहे. शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे. आजही सरकार शेतकर्यांना अग्रीम विमा रक्कम देण्याचा निर्णय घेत नाही.,दुष्काळ जाहिर करीत नाही त्यामुळे दुष्काळ जाहिर करुन शेतकर्यांना अग्रीम विमा रक्कम तत्काळ दिली नाही तर रस्त्यावर उतरुन आंदोलन केले जाईल असा इशारा यावेळी आ.कुणाल पाटील यांनी दिला.**

### अक्कलपाडा झाले म्हणून नदीला पाणी आले

**धुळे जिल्हयाच्या विकासात माजी मंत्री दाजीसाहेब रोहिदास पाटील यांचे मोठे योगदान आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे अक्कलपाडा धरण झाले म्हणूनच आज नदीला पाणी आले.पिढ्यांपिढ्या समृध्द करण्याचे काम त्यांनी केले आहे असे उद्‌गार आ.बाळासाहेब थोरात त्यांनी काढले.**

### पाच लाखांचे बक्षीस असलेल्या रस्त्याच्या शोधासाठी

# जिल्ह्याबाहेरील पथक आज टोकड्यात होणार दाखल

**नाशिक । प्रतिनिधी**

मालेगाव तालुक्यासह संपूर्ण राज्यात एक वर्षापुर्वीपासून गाजत असलेल्या व सुमारे पाच लाख रुपये बक्षीस असलेल्या १८ लाख रुपये किंमतीचा चोरी झालेल्या रस्त्याच्या शोधासाठी जिल्ह्याबाहेरील पथक आज १४ सप्टेंबर रोजी टोकडे येथे दाखल होणार आहे.

सामाजिक कार्यकर्ते विठोबा द्यानद्यान यांनी वेळोवेळी दिलेल्या तक्रारी या खोटे अहवाल सादर करून निकाली काढल्या जात होत्या. तदनंतर विभागीय आयुक्त यांच्याकडे द्यानद्यान यांनी सदर प्रकरणाची प्रकरणाची फेर चौकशी अंतरजिल्हा समितीकडून पारदर्शक पद्धतीने करून सत्यता जनतेसमोर आणत जिप नाशिक व आपल्या कार्यालयाकडे यापूर्वी खोटे अहवाल सादर करणाऱ्या लोकसेवकांवर कारवाई करण्याबाबत दिलेल्या निवेदनाची अखेर दखल घेऊन धुळे जिल्हा परिषद अंतर्गत असणाऱ्या अभियंत्यांच्या समितीकडून रस्ता अपहाराची चौकशीचे आदेश देण्यात आले होतेत. त्या आदेशान्वये आज १४ सप्टेंबर रोजी समिती टोकडे येथे चौकशीकरीता येणार असल्याचे पत्र द्यानद्यान यांना नुकतेच प्राप्त झाले आहे.

नद्यान यांनी एक वर्षापुर्वी रस्ता चोरी प्रकरणाची गंभीर तक्रार तालुका पोलीस स्टेशन मालेगाव व जिप नाशिक प्रशासनाकडे दि. २८ जुलै २०२२ रोजी व तदनंतर वेळोवेळी केली होती. त्या अनुषंगाने जे या प्रकरणात सामिल होते म्हणजे मालेगाव पंचायत समिती बांधकाम विभागाचे अभियंता यांनी चौकशी करून रस्ता सुस्थितीत असल्याचा अहवाल सादर करत द्यानद्यान यांनाच खोटे ठरवले. तसाच अहवाल या प्रकरणात सामील कार्यकारी अभियंता संजय नारखेडे जिल्हा परिषद नाशिक बांधकाम विभाग २ यांनीही आपली दिशाभूल करत खोटे अहवाल सादर करून दिलेली तक्रारीची कुठलीही चौकशी न करता परत तेच अहवाल जोडून वरिष्ठांची दिशाभूल करत दि. २३ मार्च २०२३ रोजी तक्रार निकाली काढणे बाबत खोटा अहवाल दिला.



तदनंतर द्यानद्यान यांनी विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे यांची भेट घेऊन जिप नाशिक प्रशासन आपली दिशाभूल करीत वेळोवेळी खोटे अहवाल सादर करून तक्रार निकाली काढण्याचा लांच्छनास्पद प्रयत्न करत असल्याबाबत सर्व प्रकरण समजावून सांगितले व सदर प्रकरणाची चौकशी जिल्ह्याबाहेरील समितीद्वारे करावी अशी विनंती केली होती. विभागीय आयुक्त यांनी सदर प्रकरणाची दखल घेत धुळे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आदेश देऊन तेथील अभियंता पथकाकडून तक्रारदारासोबत रस्त्याच्या चौकशी करून वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. आज सदर पथक टोकडे येथे येत आहे. रस्त्याची चौकशी करून समिती काय अहवाल सादर करते? का पुर्वीप्रमाणेच द्यानद्यान यांनाच खोटे ठरवले जाते का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.


# आयुष्यमान भव योजनेचा जिल्हा रुग्णालयात शुभारंभ



**धुळे । प्रतिनिधी**

शासनाच्या महत्वाकांक्षी उपक्रम असलेल्या आयुष्मान भव योजनेचा बुधवार दिनांक १३ सप्टेंबर २३ रोजी धुळे जिल्हा रुग्णालय येथे शुभारंभ करण्यात आला. धुळे लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ.सुभाष भामरे, जिल्ह्यधिकारी अभिनय गोयल यांच्या प्रमुख उपस्थितीत या योजनेचे उदघाटन करण्यात आले.

याप्रसंगी धुळे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सचिन बोडके, अधिष्ठाता डॉ.अरुण मोरे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.दत्ता देगांवकर, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ. स्वप्नील पाटील, डॉ. संजय शिंदे, डॉ. स्वप्नील सांगळे, डॉ. आदींची उपस्थिती लाभली. मान्यवरांनी मनोगत व्यक्त करून मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थितांना आयुष्यमान भव योजनेचे स्वरूप, महत्व व फायदे याविषयी सविस्तर माहिती समजावून सांगण्यात आली. तसेच प्रतिज्ञा देखील करण्यात आली. कार्यक्रमात निक्षयमित्र व टी. बी. वॉरियर यांचाही सत्कार मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



### सर्जा... राजा.. बैलपोळ्याची जय्यत तयारी

**शेतकऱ्यांसाठी महत्वाचा सण असलेला बैलपोळा आज साजरा करण्यात येणार आहे. शेतकरी आपल्या सर्जा-राजाची मनोभावे पुजा करून पोळा साजरा करतात, रंगी बेरंगी आरशे लावलेल्या झुल, घंटा, दोर, कासरा आदी सामानाच्या खरेदीसाठी ग्रामीण भागातील शेतकरी वाशिम शहरात दाखल झाला होते. तसेच शहरी भागात मातीच्या बैलांची पुजा करण्याची प्रथा असल्याने बाजारात विक्रीसाठी आलेले मातीचे बैल. बैलांच्या मूर्ती, सजावटीच्या साहित्यांनी शहरातील बाजारपेठ सजली आहे.**

# कमलेश सुतार यांचेवरील गुन्हे मागे घ्या, अन्यथा राज्यव्यापी आंदोलन

### श्री विश्वकर्मा संस्था, वेस्ट खान्देश, धुळेचा इशारा

**धुळे । प्रतिनिधी**

भाजप नेते किरीट सोमय्या यांचे वृत्त कायद्याच्या चौकटीत राहून प्रसारीत करणार्या लोकशाही वृत्त वाहिनीचे संपादक कमलेश सुतार यांचेवरील गुन्हे मागे घेण्यात यावे, अशी मागणी श्री विश्वकर्मा संस्था, वेस्ट खान्देश, धुळे तर्फे आज जिल्हा प्रशासनाला देण्यात आलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. गुन्हे मागे न घेतल्यास राज्यभर आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. दरम्यान मागणीकडे लक्ष वेधण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात निदर्शनेही करण्यात आलीत.



निवेदनात म्हटले आहे की, लोकशाही वृत्त वाहिनीने भाजपा नेते किरीट सोमय्या यांचे वृत्त कायद्याच्या चौकटीत राहून प्रक्षेपित केले. तसा खुलासा देखील त्यांनी केला. हे प्रकरण विधी मंडळापर्यंत गेले असता विरोधी पक्षाने याबाबत सखोल चौकशीची मागणी केली. त्यास गृहमंत्री, मुख्यमंत्री यांनी चौकशीचे आश्वासन दिले. मात्र चौकशी पूर्ण न करता कमलेश सुतार यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आला. हा अन्याय असून भारतीय लोकशाहीतील चौथा स्तंभ संबोधल्या जाणार्या पत्रकारितेवर अशा प्रकारे गुन्हे दाखल करून सरकार दडपशाही करीत आहे. राज्यातील प्रमुख पत्रकारांची जर अशी परिस्थिती असे तर सर्वसामान्यांचे काय? अशी भिती सर्वसामान्य नागरिकांना आहे. त्यामुळे कमलेश सुतार यांचेवरील गुन्हे तात्काळ मागे घेण्यात यावे अन्यथा राज्यभराती तीव स्वरूपाचे आंदोलन छेडले जाईल, असा इशारा निवेदनातुन देण्यात आला आहे. निवेदन देतांना अध्यक्ष नरेंद्र हिरे, उपाध्यक्ष संतोष मिस्तरी, कार्याध्यक्ष दिपक शार्दुल, सचिव महेंद्र शार्दुल, खनिजदार गंगाराम देसले, संघटक मधुकर हिरे यांचेसह ज्येष्ठ सल्लागार भिकाजी जगताप, गोपाल कुवर, राजेंद्र गवळे, सदस्य प्रकाश सोनवणे, भगवान मिस्तरी, सुनिल भामरे, मनोज खैरनार, किरण जगताप, दत्तात्रय जाधव, सागर मोरे, इंजि. पराग अहिरे, इंजि.कुंदन देवरे, इंजि.लोकेश सोनवणे आदींची उपस्थिती होती.

# पंचायत समितीत सरपंच संघटनेचे लक्षवेधी आंदोलन

**धुळे । प्रतिनिधी**

सिंचन विहिरी, गाय गोठे, पंतप्रधान योजनेंतर्गत ड यादीला मंजुरी द्या, अन्यथा पंचायत समिती बंद करा, अशी मागणी करत अखिल भारतीय सरपंच परिषदेतर्फे लक्षवेधी आंदोलन करण्यात आले. यावेळी वाजा वाजवून झोपलेल्या प्रशासनाला जागे करण्याचा प्रयत्न यावेळी करण्यात आला.

याबाबत सरपंच संघटनेचे तालुका अध्यक्ष राजेश पाटील यांनी सांगितले की, पंचायत समिती गेल्या चार वर्षांपासून रोजगार हमी योजनेंतर्गत सिंचन विहीर, गाय, गोठ्यांना मंजुरी देत नसल्याचे चित्र आहे. तसेच पंतप्रधान योजनेंतर्गत ड यादीतील घरकुलांनाही दोन वर्षांपासून मंजुरी देत नसल्याने अल्पभुधारक शेतकरी व घरकुलाचे लाभार्थी सदर योजनेपासून वंचित आहेत. अधिकार्यांनी शेतकर्यांच्या जिवनाशी खेळू नये. यासंदर्भात पालकमंत्री गिरीष महाजन यांनाही निवेदन दिले होते. परंतु, त्यांनी कोणतीही दखल घेतली नाही. तरी सदर सिंचन विहिरी, गाय गोठे व पंतप्रधान योजनेंतर्गत ड यादीतील लाभार्थी व शेतकरी यांना लाभ देण्याची कार्यवाही करावी, अन्यथा तीव्र बेमुदत उपोषण करण्यात येईल, असा इशाराही राजेश पाटील यांनी यावेळी दिला. याप्रसंगी राजेश पाटील यांच्यासह तालुक्यातील सरपंच रेखा पाटील, पृथ्वीराज पाटील, प्रकाश कोळी, मनिषा खैरनार, सुधाकर सौंदाणे, महादू राजपूत, सुरेखा जाधव, भाऊसाहेब देवरे, रतन बागुल, निलेश माळी, चेतन शिंदे, गोविंदा पाटील, सीमा जाधव, श्रीराम पाटील, किशोर पाटील, अजय माळी आदी उपस्थित होते.

# सार्वजनिक शौचालये जमीनोदोस्त प्रकरणी महापौर चौधरींनी दिले चौकशी आदेश

**धुळे । प्रतिनिधी**

शहराचे आमदार हे विनापरवानगी सार्वजनिक शौचालये जमीनोदोस्त करीत आहेत. हा गरिबांवर होणारा अन्याय असल्याचे म्हणत, 'तुमच्यावर तुमचाच आमदार अन्याय करीत असताना तुम्ही गप्प का?' असा संतप्त सवाल आजच्या महासभेत हिरामण गवळी यांनी उपस्थित केला. त्यावर साबीर खान, अमीन पटेल यांनी 'आमदार हा केवळ आमचाच नाही, तर तमाम धुळे शहरवासियांचा आहे', असे म्हणत हिरामण गवळी यांच्या आरोपांचे जोरदार खंडन केले. कुठलीही पुर्वपरवानगी न घेता बेकायदेशीर कार्यवाई केलेली असल्यास नक्कीच कारवाई करा, असे अनुमोदन साबीर खान यांनी केले.



त्यावर महापौर प्रतिभाताई चौधरी यांनी चौकशी करून मनपाची जागा असल्यास ती ताब्यात घेण्यात येईल व मनपाची कुठलीही परवानगी घेतलेली नसल्यास सरळ गुन्हा दाखल करण्यात येईल, असे आश्वासीत केले.

आजच्या महासभेत महापौर प्रतिभाताई चौधरी, आयुक्त अमिता दगडे -पाटील, सचिव मनोज वाघ यांचेसह विरोधी पक्ष नेत्या कल्पना महाले, गटनेत्या वालीबेन मंडोरे, माजी महापौर चंद्रकांत सोनार, प्रदीप कर्पे, माजी स्थायी समिती सभापती सुनिल बैसाणे, हिरामण गवळी, अमीन पटेल, वसीम बारी, अमोल मासुळे, साबीर खान, उमेर अन्सारी, भारती माळी, अतिरिक्त आयुक्त करुणा डहाळे आदींसह संबंधीत विभागाच्या अधिकार्यांची उपस्थिती होती.

महासभेच्या प्रारंभी राजाराम पाटील व योगेश सूर्यवंशी यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर अभिनंदनाच्या ठरावानुसार मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यात दि.२३ ऑगस्ट हा दिवस राष्ट्रीय अंतरीक्ष दिन म्हणून पाळण्यात यावा, धुळे- मुंबई रेल्वेसेवा डिसेंबरपर्यंत कायम झाल्याने खा.डॉ.सुभाष भामरे यांचे आभार मानण्याचा ठराव झाला. रायफल शुटींग स्पर्धेत चमकदार कामगिरी केलेल्या योगेश्वरीसह नुतन कार्यकारी अभियंता नवनित सोनवणे यांचा सत्कार करण्यात आला. आयुक्तांची ही पहिलीच महासभा असल्याने अमिता दगडे-पाटील यांचा देखील यावेळी सत्कार करण्यात आला.

### स्थायी समिती सदस्यपदी वंदना थोरात, सुरेखा उगले

**महासभेत विषयपत्रिकेवरील विषय क्र.२५४ नुसार स्थायी समितीच्या सदस्या प्रतिभा चौधरी, सौ.सारिका अग्रवाल यांनी स्थायी समिती सदस्य पदाचा दि.२१ फेब्रुवारी रोजी आयुक्तांकडे राजीनामा दिला. त्यामुळे स्थायी समिती सदस्यांच्या दोन जागा रिक्त झाल्या. या जागेवर नगरसेविका वंदना विक्रम थोरात व सुरेखाताई उगले यांना नियुक्त करावे असा प्रस्ताव गटनेत्या वालीबेन मंडोरे यांनी महापौरांकडे सादर केला. त्यावर सर्व सदस्यांनी एकमताने सहमती दिल्याने स्थायी समितीच्या सदस्यपदी वंदना थोरात, सुरेखा उगले यांची वर्णी लागली.**

# बैलपोळा सण घरगुती स्वरुपात साजरा करावा : जिल्हाधिकारी

**धुळे । प्रतिनिधी**

जिल्ह्यात लॅपी चर्मरोगाचा प्रादुर्भाव असल्याने पशुधनाचे एकत्रित येण्यास मनाई करण्यात आली असून शेतकऱ्यांनी बैलपोळा सण घरगुती स्वरुपात साजरा करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी केले आहे.

धुळे जिल्ह्यात सद्यस्थितीत लम्पीचा प्रादुर्भाव झाल्याने जिल्ह्यामध्ये या रोगाचा प्रसार होवू नये यासाठी जिल्ह्यातील संसर्ग केंद्र नियंत्रित क्षेत्र घोषित करुन लंपीचर्मरोगाचे नियंत्रण व प्रतिबंधासाठी गोवशीय पशुधनाचे बाजार भरवणे, प्राण्याच्या शर्यती लावणे, प्राण्यांची जत्रा भरवणे, प्राण्यांचे प्रदर्शन आयोजित करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. पशुमध्ये लंपी चर्मरोग हा अत्यंत संसर्गजन्य आजार आहे. बैलपोळा सणानिमित्त मोठ्या संख्येने पशुधन एकत्रित येत असल्याने इतर निरोगी पशुधनास लंपी चर्मरोगाचा संसर्ग होण्याची शक्यता नाकारता येत नाही. पशुमध्ये लंपी चर्मरोग हा अत्यंत संसर्गजन्य आजार आहे. त्यामुळे गोवर्गीय पशुधनास एकत्रित न येता घरगुती पद्धतीने साजरा करावा असे आवाहन जिल्हाधिकारी श्री.गोयल यांनी केले आहे.

## जिकिरीचा काळ..!

हा परीक्षेचा काळ आहे. ही परीक्षा सामाजिक संयमाची आहे. एकीकडे चांद्रयान आणि 'जी-२०'चा आल्हाद पसरला असताना राज्यातील साशंक वातावरण संपायला तयार नाही. विद्वेषाचा वेढा वाढतो आहे. 'आदळते ती माहिती आणि झिरपते ते ज्ञान' या साध्या सिद्धांताचे अनुसरण अशावेळी करायला हवे. कुणीतरी माथेफिरू आक्षेपार्ह फलक लावतो आणि दंगल उसळते; अशा हिडीस प्रकारांना आता पूर्णविराम हवा. हा समाजमाध्यमांचा कल्लोळ आहे. एखाद्या अपघातानंतर समाजमाध्यमांवर आलेला साधा संदर्भही अनेकदा इस्पितळांपुढे रक्तदानाच्या रांगा लावतो. सारे काही संपलेले नाही. मात्र, अशा देखण्या दाखल्यांमधील माणुसकीवर करवती चालू लागल्या आहेत. सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यातील दंगलीचा तोच सांगावा आहे. ही धुसफूस विज्ञानयुगाच्या बाता बंद करायला लावणारी आहे. शांतताप्रिय नागरिकांच्या मर्यादाही या जाळपोळीतून दिसून आल्या. उद्वेगाच्या ठिणगीने भवताल व्यापला जाऊ नये, याची काळजी काही लोक जिवाच्या आकांताने घेतात. जातीय चष्म्याने अनेकांची दृष्टी अधू केली असून हल्ले, प्रतिहल्ल्यांच्या सावटात शुचितेला सीमेपार ढकलले जाते आहे. सातारा जिल्ह्यातील दंगल समाजमाध्यमांनी पेटविली. समाजमाध्यमांत बलोपासनेपासून बालीशपणाचा आणि आहाराविहारापासून आचरटपणाचा संचार आहे. त्यात कधी भावनांना हात घातला जातो. कधी सेलिब्रिटींच्या नावाने आर्थिक लूट केली जाते. माहितीच्या आदानप्रदानाचा हा सेतू जेवढा रंजक तेवढाच घातकही आहे. जगात एकट्या व्हॉटस्‌ॲपद्वारे दिवसभरात पाठविल्या जाणाऱ्या संदेशांची अंदाजे संख्या साठ अब्ज असून छायाचित्रांचे आकडे पाच अब्जांच्या घरात आहेत. या विळख्याचे अप्रत्यक्ष विक्रयमूल्य एवढे मोठे आहे. या नि:शुल्क सेवेचे फायदे असले तरी हाच मोफत मंत्र अनेकदा शांततेला नख लावतो. साताऱ्यात मृत्युमुखी पडलेल्या युवकाच्या धर्माचा उमटणारा अंतस्थ प्रतिध्वनी काटा आणणारा आहे. जातींचे टोकदार होणे काय असते याची अनुभूती अवघे राज्य सध्या घेते आहे. आरक्षणाच्या प्रश्नावर समाजातील सर्व घटकांनी सामंजस्याची, परिपक्वतेची भूमिका घ्यायला हवी. एखादाही अप्रिय निर्णय वणवा पेटविण्यास कारणीभूत ठरू शकतो. अशावेळी जातींचे पलिते पोटजातींकडे वळविण्याचे विखारी कृत्य काहींनी सुरू केले आहे. चर्चेसाठी अमुक नेता चालेल, तमुक चालणार नाही अशा अतर्क्य अटी पुढे करण्यात नेते व्यग्र आहेत. पोटजातींच्या ढाली उभ्या करणाऱ्यांना भानावर आणायला हवे. नव्या जाचक नियमांचे कर्तेधर्ते राज्याला पुन्हा जातीयवादाच्या खाईत ढकलतील. जालन्यातील तिढ्याने राज्य सरकारची वाट अवघड केली. दोन पावले मागे जाण्याच्या उपोषण मंडपाच्या निर्णयातून सामाजिक ऐक्याचे संकेत गेले. महत्त्वाच्या प्रश्नांवर विरोधकांना विश्वासात घेण्यास केंद्र सरकारची कायम ना असते. राज्य सरकारने मात्र सर्वपक्षीय बैठकीतून लोकशाहीच्या मूल्यांचा अंगिकार केला. या सामोपचारी पुढाकाराचे स्वागत व्हायला हवे. विरोधकांच्या संयमालाही दाद द्यायला हवी. जालन्यातील पोलिस कारवाईवर प्रश्नचिन्ह उभे असतानाच नेमके सातारा भडकले. जमावाला डोके नसते. उद्रेक की आत्मीयता यापैकी एकाची निवड करण्याचा पर्याय सर्वांपुढे आहे. अशावेळी साताऱ्याची पुनरावृत्ती नको. नेत्यांनाही त्यांच्या अधीर अवतरणांना लगाम घालावा लागेल. सोशल मीडियातील माहितीचा स्फोट अनियंत्रित असतो. त्यात अफवांची गर्दी असते. मुळात माहिती आणि ज्ञानात फरक असतो. फक्त ज्ञान ग्रहण करणेही महत्त्वाचे नाही. ती केवळ पहिली पायरी आहे. चिंतन, मनन ही आहे उत्थानाची खरी वाट. कृत्रिम बुद्धिमत्तेचा काळ भविष्यात मोठा गोंधळ उडवेल. ऑनलाइन व्यवहारांवर पकड असलेले मातब्बर धार्मिक वा जातीय समुदायाच्या एकांगी विचारशक्तीला व्यवहाराच्या साच्यात बसवतील. बक्कळ नफा कमाविण्याच्या नादात तंत्रस्नेही जमातीकडून नैसर्गिक बुद्धिमत्तेला ग्रहण लावले जाईल. नव्या शिक्षणप्रणालीने विचारी पिढी निर्माण करावी ही अपेक्षा आहे.

# जी-२०'ने भारताचे नाव जगात उंचावले

भारतात 'जी-२०' शिखर संमेलन यशस्वी होईल की नाही, 'जी-२०' गटातील जगातील महाशक्ती असलेल्या देशांचे नेते नवी दिल्लीला येतील की नाही आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे रशिया - युक्रेन युद्ध चालू असताना सर्व संमतीने जागतिक शांततेचा ठराव संमत होईल की नाही, अशा अनेक शंका-कुशंका अगोदर व्यक्त झाल्या होत्या. पण पंतप्रधान नरेंद्र मोदींचे कुशल नियोजन आणि मुत्सद्दीपणा यातून 'जी-२०'ची शिखर परिषद यशस्वी झालीच; पण भारताचे जगात नाव उंचावले. 'जी-२०'मध्ये नवी दिल्ली घोषणापत्र सर्व संमतीने संमत करण्यात मोदींनी जी कुटनिती राबवली त्याला संपूर्ण यश मिळाले व महाशक्ती असलेल्या देशांमध्ये एकवाक्यता घडविण्यात भारत यशस्वी झाला. 'जी-२०' परिषदेत जो ठराव संमत झाला त्यात कोणीही अडथळे आणले नाहीत. सर्व देशांमध्ये एकवाक्यता घडविण्यात कोणी बिब्बा घातला नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ऑफ्रिकन संघराज्याला 'जी-२०' मध्ये सहभागी करून घेण्यास अमेरिका, फ्रान्स, ब्रिटन आदी कोणीही देशांनी विरोध केला नाही. एवढेच नव्हे तर भारताच्या प्रस्तावाला चीननेही पाठिंबा जाहीर केला.

देशाची राजधानी नवी दिल्लीत झालेल्या तीन दिवसांच्या 'जी-२०' परिषदेची तयारी वर्षभर चालू होती. वर्षभर देशभरात विविध शहरांतून चर्चासत्र, परिसंवाद असे कार्यक्रम चालू होतेच. नवी दिल्लीत कडेकोट सुरक्षा व्यवस्था होती. तीन दिवस शाळा - कॉलेज तसेच कार्यालयांना सुट्टी जाहीर केली होती. राजधानीतील मेट्रो रेल्वेच्या स्थानकावर एके ठिकाणी 'खलिस्तान झिंदाबाद'च्या घोषणा रंगवून काहींनी लपून-छपून अपशकून करण्याचा प्रयत्न केला. पण सुरक्षा व्यवस्थेने तो हाणून पाडला. मुंबईवर तसेच दिल्लीत संसद भवनावर काही वर्षांपूर्वी झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा अनुभव असल्याने सुरक्षा व्यवस्था अतिशय काटेकोर ठेवण्यात आली होती. त्यामुळेच कोणताही अनुचित प्रकार न घडता 'जी-२०' संमेलन दिल्लीत शानदारपणे साजरे झाले. 'जी-२०' शिखर परिषदेच्या पहिल्याच दिवशी नवी दिल्ली घोषणा पत्र स्वीकारण्यात आल्याची घोषणा परराष्ट्रमंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी केली, त्याने सर्वांनाच विशेषत: मीडियाला सुखद धक्का बसला. सदतीस पाने व ८३ परिच्छेद असलेल्या या घोषणापत्रावर चीन-रशियासह सर्व देशांनी एकमताने १०० टक्के संमती दर्शवली. 'जी-२०'च्या परिषदेत प्रथमच असे घडले की, तेथे संमत झालेल्या ठरावावर अन्य कोणा देशांचा वेगळा अभिप्राय किंवा वेगळे मतप्रदर्शन आले नाही. गेल्या वर्षी इंडोनेशियामध्ये 'जी-२०' शिखर परिषद पार पडली. तेथे ऑफ्रिकन युनियनच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे 'जी-२०'चे सदस्यत्व आपणास मिळावे, अशी विनंती केली होती. मोदींनी त्यांना तसा शब्दही दिला होता. नवी दिल्लीत झालेल्या 'जी-२०' परिषदेत मोदींनी दिलेला शब्द पाळून दाखवला व ऑफ्रिकन युनियनला सहभागी करून घेण्यात आले. खरं तर ऑफ्रिकन युनियनला 'जी-२०'चे सदस्यत्व देणे सहज सोपे




नव्हते. चीन व रशिया यांचे वेगळे मत होते.

'जी-२०'चा विस्तार करणे मुळातच चीनला पसंत नव्हते. पण त्यांचे मन वळविण्यात मोदींना यश आले असेच म्हणावे लागेल. ऑफ्रिकी युनियनवर चीनचे गेल्या काही वर्षांपासून लक्ष आहेच. त्या देशांमध्ये मोठी गुंतवणूक करता येईल असे चीनचे आडाखे होते. आता आफ्रिकन युनियन 'जी-२०'चे सदस्य झाल्यामुळे केवळ चीनला त्या देशांवर आर्थिक लक्ष्य करणे कठीण जाईल. आफ्रिकन युनियनमधील ५५ देश यापुढे चीनच्या प्रभावाखाली येण्यापासून स्वत:चा बचाव करू शकतील किंवा चीनला मर्यादा ओलांडून त्या देशांना आपले लक्ष्य करता येणार नाही. रशिया-युक्रेनच्या मुद्द्यावर सर्वसहमती होणार नाही, हे अनेकांनी गृहीतच धरले होते. युक्रेनमध्ये निर्माण झालेल्या परिस्थितीला रशियाला जबाबदार धरून रशियाचा निषेध करावा असे काहींचे मत होते. पण रशिया हा भारताचा पारंपरिक मित्र आहे, हेही लक्षात ठेऊन ठरावाचा मसुदा बनविण्यात आला होता. गेल्या वर्षी इंडोनेशियात 'जी-२०' परिषदेत झालेल्या ठरावावर रशिया-युक्रेन मुद्द्यावर सहमती झालेली नव्हती. चीन व रशिया यांनी ठरावाला आपली स्वतंत्र टिप्पणी जोडली होती. युक्रेनबाबत ठरावातील मसुद्याशी तेव्हा त्यांनी असहमती दर्शवली होती. तशी पाळी भारतात आली नाही हे विशेष म्हटले पाहिजे.

'जी-२०' हे काही आंतरराष्ट्रीय राजकीय व्यासपीठ नाही. अर्थ व्यवस्थेशी संबंधित असलेल्या मुद्द्यांवर या परिषदेत चर्चा केली जाते. जी-२० हा आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्य करणारा मंच आहे. या मंचावर राजकीय किंवा सुरक्षाविषयक मुद्द्यांवर चर्चा केली जात नाही. 'जी-२०' शिखर संमेलन भारतात यशस्वीरीत्या संपन्न झाले म्हणून जागतिक बँकेचे अध्यक्ष अजय बंगा यांनीही भारताची प्रशंसा केली आहे. सर्व सहमती कशी निर्माण करायची आणि ठराव एकमताने कसा संमत करून घ्यायचा याची दिशा भारताने जगाला दाखवून दिली, अशा शब्दांत अजय बंगा यांनी भारताचे कौतुक केले आहे. या परिषदेत प्रत्येक देशाने आपले राष्ट्रीय हित कसे जपले जाईल याची काळजी घेतलीच, पण दुसऱ्या देशांची भूमिका सुद्धा काळजीपूर्वक ऐकून घेतली. ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बनीज यांनी 'जी-२०' संमेलन यशस्वी झाल्याबद्दल भारताचे कौतुक केले आहे. भारत व ऑस्ट्रेलिया दरम्यान आर्थिक सहयोग समझोता झाला असून त्याला अनुसरूनच दोन्ही देशांकडून पावले उचलली जात आहेत, असेही त्यांनी म्हटले आहे. याच संमेलनात भारत-मध्य पूर्व-युरोप शिपिंग व रेल्वे कनेक्टिव्हीटी कॉरिडॉरची घोषणा झाली. मोठे देश अन्य देशांतील पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी पुढाकार घेतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. 'जी-२०' शिखर संमलेनात एका वाक्यात सांगायचे तर 'एक पृथ्वी, एक परिवार, एक भविष्य' यावर प्रकाशझोत होता. सौदी अरबचे क्राऊन प्रिन्स सलमान यांनी आर्थिक कॉरिडॉर उभारणीच्या मुद्द्याचे स्वागत केले. युरोपिअन कमिशनचे अध्यक्ष उर्सुला वॉन डेर लेन यांनी मध्यम उत्पन्न असलेल्या देशांना पायाभूत सुविधांसाठी भांडवल गुंतवणुकीची मोठी आवश्यकता असल्याचे सांगितले. त्या दृष्टीने भारत-मिडल इस्ट, युरोप इकॉनॉमिक कॉरिडॉर महत्त्वाचा असल्याचे सांगितले. अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडन आणि ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक यांच्या भोवती 'जी-२०' शिखर परिषदेमध्ये कॅमरे सतत फिरत होते आणि भारतीय जनतेला त्यांच्याविषयी अधिक आकर्षण होते.

'जी-२०' संमेलनात भारताने आपले शेजारी मित्र असलेल्या बांगला देश, मॉरिशस, संयुक्त अरब अमिरात आदी देशांना विशेष आमंत्रित करून आपल्या मित्र धर्माचे पालन केले. भारत-बांगला देश यांचे संबंध दृढ राहिले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी व बांगला देशच्या पंतप्रधान शेख हसीना वाजेद यांचे मैत्रीपूर्ण संबंध आहेत. दोन्ही देश सार्क, विम्स टेक, हिंदी महासागर तटीय क्षेत्रीय सहयोग संघ, राष्ट्रकुल यांचे सदस्य आहेत. बांगला देश, तसेच भारतातील पश्चिम बंगाल, त्रिपुरा हे बांगला भाषा बोलणारे प्रांत आहेत. बांगला देश स्वातंत्र्य युद्धात भारताचे योगदान मोठे होते. शेख हसिना यांच्या मनात भारताविषयी कृतज्ञता भाव आहे. त्यांचे वडील व बांगला देशाचे संस्थापक शेख मुजीबूर रहेमान, आई आणि तिघा भावांची १५ ऑगस्ट १९७५ रोजी हत्या झाली. त्यावेळी शेख हसिना, त्यांचे पती वाजिद मियां व दोन मुलांसह त्या जर्मनीमध्ये होत्या. त्यांचे पती अण्वस्त्र शास्त्रज्ञ होते. त्यावेळी शेख हसिना परिवारासह भारतात आल्या व त्यांना भारताने आश्रय दिला. त्या सहा वर्षे भारतात राहात होत्या.'जी-२०' संमेलनात मॉरिशसचे पंतप्रधान प्रविंदकुमार जगन्नाथ यांनीही मोदींबरोबर आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर चर्चा केली. जगन्नाथ यांचे भारताशी कौटुंबिक संबंधही आहेत. दोन्ही देशांत परस्परांविषयी आदर आहे. मॉरिशसप्रमाणेच आखाती देशात भारतीयांची संख्या मोठी आहे. आखाती देशात नोकरी व रोजगारात ७० ते ८० लाख भारतीय असावेत असा अंदाज आहे. 'जी-२०'च्या बाहेर जाऊन बघितले तर मलेशियामध्येही २५ लाखांवर भारतीय आहेत. 'जी-२०' संमेलनाच्या निमित्ताने मोदींनी विविध देशांच्या प्रमुखांशी चर्चा करून भारताचे आर्थिक संबंध बळकट करण्यावर भर दिलाच, पण 'वसुधैव कुटुंबकम' असा संदेश भारताने जगाला दिला.

# जरांगे यांच्या अटी; सरकारची कसोटी


सर्वोच्च न्यायालयाने मराठा समाजाला दिलेले आरक्षण नाकारल्यानंतर मनोज जरांगे-पाटील यांच्या उपोषणाने पुन्हा हा मुद्दा राज्याच्या केंद्रस्थानी आला आहे. मराठा समाजाला आरक्षण देण्यास कुणाचाच विरोध नाही. मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे, अशी सर्वच राजकीय पक्ष व नेत्यांची भूमिका आहे. अन्य कोणत्याही समाजाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण दिले जाईल अशी राज्याच्या अनेक मुख्यमंत्र्यांनी यापूर्वी भूमिका मांडली आहे व तीच भूमिका आजचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मांडत आहेत. मराठा आरक्षणासाठी गेले पंधरा दिवस जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील अंतरवाली सराटी येथे उपोषण करणारे जरांगे-पाटील यांनी उपोषण मागे न घेता, सरकारला मराठा आरक्षण देण्यासाठी आणखी एक महिन्याची मुदत देत असल्याचे सांगितले. जरांगे-पाटील यांनी गेले दोन आठवडे सरकारचे या संवेदनशील प्रश्नाकडे लक्ष वेधून घेतले आहे, हेच त्यांचे मोठे यश आहे. सरकारही मराठा समाजाला कसे आरक्षण देता येईल यासाठी वेगवेगवळ्या स्तरावर प्रयत्न करीत आहे. पण उपोषण मागे घेताना सरकारला कालबद्ध अटी घालणे हे योग्य आहे का, असा प्रश्न निर्माण होतो.

जरांगे-पाटील यांच्याविषयी शिंदे-फडणवीस-अजित पवार सरकारने सुरुवातीपासून सहानुभूती ठेवली आहे. उपोषण मागे घ्यावे यासाठी त्यांनी जरांगे-पाटील यांना अनेकदा आवाहन केले. त्यांच्या आंदोलनाच्या निमित्ताने मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर कसा मार्ग काढता येईल यावर सरकारने सर्वपक्षीय बैठकही मुंबईत बोलावली. सर्वपक्षीय बैठकीत जरांगे -पाटील यांनी उपोषण मागे घ्यावे असे त्यांना आवाहन करण्यात आले. खरं, तर अशा आवाहनानंतर त्यांनी लगेचच आपले उपोषण मागे घ्यायला हवे होते. त्यांनी केलेल्या मागणीनुसार सरकारने आंदोलकांवर झालेल्या लाठीमार प्रकरणी चार पोलीस अधिकाऱ्यांना निलंबित केले. आंदोलकांवर नोंदवले गेलेले गुन्हे मागे घेण्यात येतील, असेही सरकारने जाहीर केले. जरांडे-पाटील यांनी पाठविलेल्या शिष्टमंडळाबरोबरही सरकारने चर्चा केली. मराठा समाजाला कसे आरक्षण देता येईल व कुणबी म्हणून प्रमाणपत्र देता येईल का? याचा अहवाल देण्यासाठी सरकारने समिती नेमली. सरकारच्या वतीने गेल्या दोन आठवड्यांत तीन-चार मंत्री व काही आमदारही उपोषणस्थळी जाऊन जरांगे-पाटील यांना भेटले व त्यांची भूमिका समजावून घेतली तसेच सरकारची भूमिकाही त्यांना पटवून देण्याचा प्रयत्न केला. जरांगे-पाटील यांनी उपोषण पुढे चालू ठेवू नये यासाठी सरकारने बरचे प्रयत्न केले. पण मराठ्यांना सरसकट कुबणी प्रमाणपत्र द्यावे, या संवेदनशील मुद्द्यावर निर्णय घेताना कायदेशीर बाबी काटेकोर तपासाव्या लागणार आहेत. तसेच या निर्णयाचे सामाजिक परिणाम काय होतील याचाही वेध घ्यावा लागणार आहे. मराठा विरुद्ध ओबीसी असा संघर्ष होणार नाही, याचीची दक्षता घ्यावी लागणार आहे.

अण्णा हजारेंपासून अनेक जणांनी अनेक विषयांवर राज्यात यापूर्वी उपोषण केले आहे. पण जरांगे-पाटील यांनी मांडलेला विषय अत्यंत संवेदनशील आहे. मराठा समाजाला न्यायालयात टिकेल असे आरक्षण देणे आवश्यक आहे. यापूर्वी दिलेले आरक्षण सर्वोच्च न्यायालयात टिकलेले नाही, हा अनुभव लक्षात घेऊन महायुतीचे सरकार काळजीपूर्वक पावले टाकत आहे. जरांगे-पाटील यांनी सुरुवातीला मराठवाड्यातील मराठा समाजाची भूमिका मांडली. निजाम काळात मराठा समाजाच्या कागदपत्रांवर कुणबी असा उल्लेख आहे, म्हणून या समाजाला सरकारने कुणबी प्रमाणपत्रे द्यावीत ही त्यांची सुरुवातीला मागणी होती. त्यानुसार सरकारने राज्य मंत्रिमंडळाची बैठक घेऊन तसा निर्णय घेतला व निजामकालीन कागदपत्रांमध्ये वंशावळीचा उल्लेख कुणबी असेल तर त्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्यास सरकारची मान्यता आहे, असा जीआर निघाला. पण त्याने जरांगे-पाटील यांचे समाधान झाले नाही. सर्व मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे यासाठी ते हटून बसले व त्यांचे उपोषण त्यांनी चालूच ठेवले. मराठ्यांना सरसकट कुणबी प्रमाणपत्र द्यावे अशी मागणी यापूर्वी कोणी केली होती का, या शोध घ्यावा लागेल. गेले पंधरा दिवस जरांगे-पाटील जे सांगत राहिले व सरकार ते ऐकत राहिले असे वातावरण होते.

आपण आंदोलनाचे स्थळ सोडणार नाही, एक महिन्यानंतर ३१व्या दिवशी कुणबी प्रमाणपत्र वाटायला सुरुवात केली नाही तर मंत्र्यांना फिरू देणार नाही, अशी भाषा ते का वापरत आहेत? बेमुदत उपोषण करून त्यांनी सरकारवर दबाव टाकला आहेच, आता सरकारला धमकीची भाषा वापरत आहेत. आरक्षण देण्याची जबाबदारी सरकारची आहे, असे ते सरकारला सारखे बजावत आहेत. राज्याचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री व संपूर्ण मंत्रिमंडळ यांना आमच्या उपोषणस्थळी यावे लागेल असे ते सांगत आहेत. यातून त्यांना काय सुचवायचे आहे. कोणताही निर्णय घाईघाईने घेणे सरकारला धोकादायक ठरू शकते. सरकार मराठा आरक्षणासाठी सकारात्मक आहे. आरक्षण कायद्याच्या निकषावर टिकेल अशा पद्धतीने देता यावे म्हणून काळजीपूर्वक पावले उचलत आहे. मग सरकारवर वेळेची मुदत देऊन दबाव टाकणे योग्य आहे का? बळाचा वापर करणाऱ्या पोलिसांवर कारवाई आणि आंदोलकांवरील गुन्हे मागे या प्रमुख मागण्या सरकारने मान्य केल्या आहेत. स्वत: गृहमंत्र्यांनी पोलीस बळाचा वापर झाला म्हणून दिलगिरी व्यक्त केली आहे. सरकार हे समाजाचे विश्वस्त व पालक आहे. त्यामुळे आता सरकारबरोबर नियमित संवाद चालू ठेवणे गरजेचे आहे.

## शब्दकोडे-१७८



**आडवे शब्द**

१. फायदा-तोटा ५. व्यावयाम ८. युद्ध ११. रस्ता, मार्ग १२. रूक्ष, कोरडे १३. कारण नसताना १४. कारस्थान १६. नीच, दुष्ट १८. कपोल २१. रवाळ, कणी असलेले २३. शरीर २५. सारखा २६. पराभव, ऱ्हास २७. फुरसत २९अ. सोलापूरचा प्रसिद्ध चटकदार पदार्थ ३०. एक चतुर्थांश ३१. गणपतीचे एक नाव ३३. पोवळे ३४. रसपूर्ण ३६. घाण ३७. नरसंहार ३८. रजतपटावरील अजरामर सौंदर्यसम्राज्ञी ४०. कणीदार ४२. उत्सव ४३. रूंद (बांधा) ४५. पांढराशुभ्र लुसलुशीत प्राणी ४७. डावा ४८. आघाताचे आयुध ४९. भारताचे पहिले पंतप्रधान ५३. एकरुप ५५. जरच्या मागेमागे येणारा अटीचा शब्द ५६. नटवा, सजावट करा ५७. बंदी, मज्जाव ५८. एक श्वासरोग ६०. नोकरी नसलेला निरूपयोगी? ६२. टक, दृष्टी ६५. कहाणी ६६. कळपातील प्रमुख हत्ती ६७. जास्वंद ६९. लोणी ७१. सीतापती ७२. दाट, ढग ७३. आचारी ७६. शूर पुरुष ७९. शिकार ८०. खोदकाम ८१. गवताचे रुंद पान ८२. एकाक्षरी प्रश्न ८३. मला ८४. प्रत्येक दिवशी ८५. मीठ, लवण ८६. चप्पल

**उभे शब्द**

१. नूतन २. मोठा दरवाजा ३. अचानक झालेला बदल ४. श्रेष्ठ पुरुष ५. लाकूड कापण्याचे हत्यार ६. मैत्रीण ७. रत्न ८. हेतू धरून केलेले कार्य ९. करपलेला, जळलेला भाग १०. तोफगाडी १३. नीच, दुष्ट १५. धरणे १७. गुजराथी नृत्यप्रकार १९. चटकन, त्वरित २०. गावाची हद्द २२. सेवक २४.'- - उतरू आलं, अंग झिम्माड झालं.' २६. पवित्र २८. घालविणे, गाळणे, सोडणे २९. फुरसत ३०. बासरी ३२. नगर, मोठे गाव ३३. अत्यंत हुशार, विद्वान ३५. नमस्काराचा एक शब्द ३६. उंटाच्या पाठीवरील उंचवटा ३८. शंभर किलो ३९. खाज ४१. दावा लावणारा, वैरी ४२. कमळ, मुलीचे एक नाव ४३. --- सामने, समोरासमोर ४४. गायीचे बछडे ४५. उद्देशावाचून ४६. उंट हाकणारा ४७. एक द्विदल धान्य ४८. येरझारा, जाणे-येणे ५०. निष्णांत ५१. दिवस ५२. विरोध, प्रतिबंध ५३. सारखा ५४. अंगरखा ५९. घरातील मधली खोली ६१. फणसाच्या एक प्रकार ६३. लोकांच्या मनातील विचार ६४. आवाज, गोगाट ६८. कर्ण ७०. पाणी ७३. घशाला त्रास देणारा अळू ७४. शर्करा ७५. मागाहून, मग ७७. दारूचा एक प्रकार ७८. विद्युत ७९. शृंगार, कोल्हापुरी दागिना ८१. कालवा, लग्न

## शब्दकोडे १७७ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.विलासराव देशमुख ८.चमत्कार ११.तगर १२.नयन १३.राख १४.रयत १६.शवासन १७.वनचर १९.परकर २१.कलाकार २२.हारा २३.पार्थसारथी २४.समर २७.वामनावतार ३०.कलागत ३२.वारस ३५.हाट ३६.रणगाडा ३८.रविवासर ४०.परवानगी ४३.रोखठोक ४५.वातड ४६.अवजड ४८.काजवा ४९.सुर ५०.बारदान ५२.थोर ५३.तडीपार ५४.हेरंब ५५.रासगरबा ५८.मालामाल ६०.मगर ६३.नारायण नारायण ६७.जरब ६९.पाप ७०.खर ७१.दानी ७२.रयतवारी ७४.सणवार ७५.अस्वीकार ७६.बोका

**उभे उत्तर**

१.१.विसर २.सतत ३.राग ४.वडा ५.शनिवार ६.खनन ७.कानवला ८.चराचर ९.मखर १०.रडराऊत १५.यथार्थ १६.शक १८.नकार १९.परवा २०.रथीमहारथी २१.कर २३.पारावार २४.सतार २५.मरण २६.चेला २८.नाट २९.खडा ३०.कसरत ३१.गहन ३३.रवि ३४.सवालजबाब ३७.गायक ३९.सरोज ४०.पवार ४१.वाडवडील ४२.गीतकार ४४.खवा ४६.अवहेलना ४७.डर ४८.कानस ४९.सुरमा ५१.दारा ५३.तमाशा ५६.रमण ५७.बाग ५९.कणखर ६१.रजनी ६२.विपरीत ६४.रावण ६५.नार ६६.यशस्वी ६८.बरका ६९.पावा ७१.दार ७३.तर्क

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

## निधन वार्ता

### रामदास गांगुर्डे



**दहिवेल ।** येथील मालनगाव येथील कै रामदास जयराम गांगुर्डे यांचे दि १२ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या अंत्यविधी मालनगाव येथे दि १३ रोजी करण्यात आला.ते प्रगतिशील शेतकरी भटू गांगुर्डे ,संजय गांगुर्डे,व साक्री तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष व कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती भानुदास गांगुर्डे यांचे वडील होते.त्यांच्या मागे तीन मुलं ,सुना ,नातवंडे असा परिवार आहे.

## न्यूज कॉलम

### हमालास मारहाण; संशयितावर गुन्हा

धुळे । कारण नसताना हमालास मारहाण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला. याबाबत हमाल अरुण भिलाजी रायगुडे यांनी तक्रार दिली. त्यानुसार रविवारी सायंकाळी सहाच्या सुमारास त्यास भरत उत्तमराव नरवाडे याने शिवीगाळ करीत ठार करण्याची धमकी दिली. तसेच हाताबुक्क्यांनी व लाकडी दांडक्याने जखमी केले.

# नाशिक शिवसेना महिला आघाडीच्या मंगळागौरीला महिलांचा उस्फूर्त प्रतिसाद

**सिडको । प्रतिनिधी**

शिवसेना महिला आघाडीच्या वतीने मंगळागौरीचे आयोजन करत शासकीय योजनांची माहिती देण्यात आली. यावेळी महिलांनी पारंपारिक वेशभूषा परिधान करत कार्यक्रमाचा आनंद लुटला. कार्यक्रमाचे आयोजन लेखानगर येथील वेदांत मंगल कार्यालयात करण्यात आले.

जागर स्त्री शक्तिचा म्हणत मंगळागौरीचा महिलांनी लुटला मनमुराद आनंद लुटला. ढोलकीच्या तालावर महिला थिरकल्या. स्वत:साठी जगता आलं पाहिजे या वाक्याची प्रचिती आली. शिवसेना महिला आघाडी महानगराच्या वतीने मंगळागौर स्पर्धेसाठी मोठ्या संख्येने उपस्थित महिला-भगिनींनी मनसोक्त आनंद घेतला. या स्पर्धेत बहुंताश मंडळ सहभागी झालेले होते. स्पर्धा सुरु होण्याआधी शिवसेनेच्या महिला महानगरप्रमूख अस्मिता देशमाने यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली. विशेषत: मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महिला-भगिनींसाठी अमलात आणलेल्या योजना यावेळी सांगण्यात आल्या. महिला भगिनींना शासन आपल्या दारी ही पुस्तिका देण्यात आली. यावेळी महीलांना बचतगटांविषयी माहिती शिवसेनेच्या बचतगट जिल्हा संघटक ज्योती फड यांनी दिली.

स्पर्धेचे निरिक्षक डॉ.वृषाली व्यवहारे, शिवसेना विधानसभा समन्वयक,अर्चना मगर, अकिया क्रिऐशनच्या संचालिका तर शिवसेना विधानसभा अध्यक्षांनी उत्कृष्ट ग्रूप आणि





मराठमोळ्या वेश भुषेतील स्पर्धक यावेळी निवडले. स्पर्धेसाठी पहिली तीन बक्षिस देण्यात आलीत. उत्तेजनार्थ दहा बक्षीस देण्यात आली. यावेळी आरती गायखे शिवसेना उपमहानगरप्रमुख, किर्ती ठाकूर, उपमहानगर प्रमूख, रंजना सायखिंडकर, उपमहानगर प्रमुख सुलोचना मोहीते, विधानसभा अध्यक्ष, संगिता अव्हाड, दिपाली गिरासे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. यावेळी अर्चना अजय बोरस्ते यांनी पारंपारिक वेशभुषेतील महिला भगिनींना कौतूकाची थाप देत आपले मनोगत व्यक्त केले.

शिवसेनेच्या जिल्हा समन्वयक ॲड. शामला दिक्षित, शिवसेनेच्या ग्रामिण जिल्हा प्रमुख मंगला भास्कर, जिल्हा प्रमुख शोभा गटकळ, जाधव, ग्रामिणच्या प्रमुख ॲड,श्रद्धा जोशी, हास्य क्लबच्या भारती चौधरी, खांबेश्वर प्रतिष्ठानच्या संचालिका मनिषा जाधव, राधाकृष्ण महिला मंडळाच्या अध्यक्षा सोनाली पोटे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ईश्वरी गायकवाड या होत्या. यावेळी महानगर प्रमुख अस्मिता देशमाने यांनी मंगळागौरीचे पूजन केले. सुत्रसंचालन आर.जे.परी यांनी केले.

# नाशिकच्या रिचआऊट आर्ट गॅलरीत 'ब्सट्रॅक्ट' चित्र प्रदर्शनाचे आयोजन

### चित्र प्रदर्शनात डॉ.शेफाली भुजबळ यांच्या चित्रांचा समावेश

**नाशिक । प्रतिनिधी**



नाशिकच्या कॅनडा कॉर्नर येथील रिचआऊट आर्ट गॅलरीत दि.१६ ते १८ सप्टेंबर रोजी तीन दिवसीय 'ब्सट्रॅक्ट' चित्रप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनात डॉ. शेफाली भुजबळ यांच्या 'ब्सट्रॅक्ट' चित्रांचा समावेश आहे. दि. १६ रोजी सकाळी ११ वाजता या चित्रप्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात येणार असून सकाळी ११ ते रात्री ७ या वेळेत सर्वांसाठी हे चित्रप्रदर्शन खुले असणार आहे.

या 'ब्सट्रॅक्ट' चित्रप्रदर्शनात आनंद माळी, अभिजित पाठक, ब्रिंदा मिलर, दिपक सोनार, देव, हुकुमलाल वर्मा, इरेना व्हीझेन, कैलाश काळे, कार्तिकेय शर्मा, माधुरी खाटे, महेश जगताप, मनोज कांचनगल, निलेश शहारकर, निलाद्री शेखर, नितीन अग्रवाल, निवास कन्हेरे, पंडित खैरनार, प्रकाश आनंद, प्रिथा कानन, राजेंद्र पाटील, रवी मंडलिक, रेघू नेवारे, संजीव सोनपिंपरे, सतीश वावरे, शामेधू सोनवणे, शिलादित्या सरकार, शिवकुमार सुनागर, श्रीकांत कदम, सुधीर तालमले, सुनील पडवळ, सुहास शिलकर, विणा चित्रकार, वितोआर्थर, यशवंत देशमुख, झाहिद बीन अमर या ३६ चित्रकारांच्या 'ब्सट्रॅक्ट' चित्रांचा समावेश आहे. एमईटी भुजबळ नॉलेज सिटीच्या मार्गदर्शिका डॉ.शेफाली भुजबळ यांची ब्सट्रॅक्ट पेंटिंग या शैलीतील प्रसिद्ध पेंटिंग्स नेहमीच विविध प्रदर्शनात प्रसिद्ध झाली आहेत व त्यांना कलाप्रेमींचा खूप सुंदर प्रतिसादही मिळाला आहे. नाशिकच्या रिचआऊट आर्ट गॅलरीतील 'ब्सट्रॅक्ट' चित्र प्रदर्शनामध्ये डॉ.शेफाली भुजबळ यांच्या काही निवडक पेंटिंग्सचा सहभाग आहे. कला व चित्रप्रेमींनी या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा असे आयोजक एजवाईज व्हेंचर प्रायव्हेट लिमिटेड या संस्थेच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.

# कर्मचारी बँकेचा गुणगौरव समारंभ २२ सप्टेंबरला

**नाशिक । प्रतिनिधी**

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांची आर्थिक जननी म्हणून ओळखली जाणारी नाशिक जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँक २२ सप्टेंबर रोजी १०४ व्या वर्षात पदार्पण करत आहे. दरवर्षी वर्धापन दिनाचे औचित्य साधून सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा सत्कार व कौतुक मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. नाशिकचे विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. बी. जी. शेखर पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम होईल.

तर प्रमुख पाहुणे म्हणून नाशिक कोषागार कार्यालयातील वरिष्ठ कोषागार अधिकारी महेश बच्छाव यांच्या सत्कार हस्ते होणार असल्याची माहिती बँकेचे अध्यक्ष बाळासाहेब ठाकरे पाटील व उपाध्यक्ष महेश मुळे यांनी दिली. कार्यक्रमात राज्य शासन पुरस्कार प्राप्त सभासदांचा आणि इयत्ता दहावीसाठी किमान ७५ टक्के बारावी साठी किमान ७० टक्के व पदवीधर पदवी साठी किमान ६० टक्के गुण आवश्यक आहे. त्याचबरोबर विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार होणार आहे. रावसाहेब थोरात सभागृह, मॅरेथॉन चौक, गंगापूर रोड, नाशिक येथे शुक्रवार दि. २२ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता कार्यक्रम संपन्न होणार आहे. ज्या सभासदांचे पाल्य हे निकषास पात्र असतील त्यांनी आपले अर्ज गुणपत्रिकेससह आपल्या जवळच्या शाखेत येत्या दि. २० सप्टेंबरपूर्वी जमा करावेत, कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन अध्यक्ष बाळासाहेब ठाकरे पाटील, उपाध्यक्ष महेश मुळे, संचालक प्रमोद निरगुडे, निलेश देशमुख, अजित आव्हाड, मंदाकिनी पवार, सुनील गिते, धनश्री कापडणीस, रवींद्र आंधळे, रवींद्र बाविस्कर, मोहन गांगुर्डे, ज्ञानेश्वर माळोदे, जयंत शिंदे, विजय देवरे, रमेश बोडके, अभिजीत घोडेराव, सचिन विंचुरकर, विक्रम पिंगळे, अमोल बागुल, विनोद जवागे व भरत राठोड यांनी केले आहे.




# योगेश ठाकरे यांचा मविप्रतर्फे सत्कार

**नाशिक । प्रतिनिधी**

देवळाली कॅम्प महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी योगेश भास्कर ठाकरे यांची नुकतीच एमपीएससी मार्फत कक्ष सहाय्यकपदी निवड झाली. या निवडीबद्दल त्यांचा मविप्र संस्थेच्या वतीने सन्मान करण्यात आला.

यावेळी संस्थेचे सरचिटणीस ड .डॉ. नितीन ठाकरे, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपाध्यक्ष विश्वास मोरे, उपसभापती देवराम मोगल, संचालक डॉ सयाजीराव गायकवाड, रमेश गडाख, प्राचार्य डॉ. संपत काळे उपस्थित होते. योगेश ठाकरे यांनी आर्मीमध्ये १७ वर्ष आपली सेवा पूर्ण करून एमपीएससी मध्ये यश मिळविले आहे, त्यामुळे त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# मुकेशभाई पटेल सैनिकी विद्यालयाचे बेसबॉल स्पर्धेत घवघवीत यश

**शिरपूर । प्रतिनिधी**

श्री विलेपार्ले केळवाणी मंडळ मुंबई संचलित तांडे ता. शिरपूर येथील मुकेशभाई पटेल मुला-मुलींची सैनिकी शाळा व कनिष्ठ विज्ञान महाविदयालयाच्या खेळाडूंनी बेसबॉल स्पर्धेत घवघवीत यश प्राप्त केले आहे.

धुळे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अंतर्गत धुळे जिल्हा शालेय शासकीय क्रीडा स्पर्धा कळमसरे येथील उद्यान पंडित बापूसाहेब ग.द.माळी गुरुजी शिक्षण प्रसारक संस्थेच्या आदर्श माध्यमिक विद्यालयात स्पर्धा उत्साहात संपन्न झाल्या. या स्पर्धेसाठी प्रमुख अतिथी म्हणून थाळनेरचे दीपक जमादार, मांडळचे माजी सरपंच गौरव मोहन सोनवणे, शिरपूर तालुका क्रीडा अधिकारी एम.के.पाटील, शिवसेना तालुकाप्रमुख कन्हैया चौधरी, महाराष्ट्र तलवारबाजी संघटनेचे सदस्य मनोज धनगर, मराठा पाटील बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब चव्हाण, धुळे जिल्हा बेसबॉल संघटनेचे सचिव कैलास कंखरे, मुख्याध्यापक वाय. व्ही. पाटील, बेसबॉल संघटनेचे सदस्य राजेश मोरे, रोहित धनगर, ओम धनगर, धुळे जिल्हा संघटनेचे सचिव मयूर बोरसे, मुकेशभाई पटेल मिलिटरी स्कूलच्या क्रीडा शिक्षिका डॉ. ज्योत्स्ना जाधव आदी उपस्थित होते .

### सर्व विजय संघातील यशस्वी खेळाडू :

**१४ वर्षा आतील मुली : कॅप्टन भाविका अरविंद पाटील, हस्मिता बाळूअहिरे, ऐश्वर्या योगेश धोबी, अनन्या अनिल मानकर, छाया गणेश खैरनार, कावेरी विजयकुमार चौधरी, निधी खंडुसिंग गिरासे, वैष्णवी किशोर पाटील, अनुष्का महेंद्र भदाणे, दिक्षा राहुल भारंबे, कार्तिक गणेश शिरसाठ, सोनाक्षी जगदीश पाटील, हेरल निलेश झोपे, नव्या गोपाळ पाटील, ओमश्री नागराज सैंदाणे, साक्षी प्रकाश पाटील.**

**१४ वर्षा आतील मुले : कॅप्टन श्रेयस विजय माली, पार्थ कुंदन चौधरी, मोहित हेमंत पाटील, अर्णव कुमारेशचंद्र रॉय, आदित्य स्वप्नील बिरल, तेजस हिम्मत बोरसे, तेजस हिम्मत बोरसे, दिशांक देवेंद्र ढोले, प्रणव नरेंदसिंग नाईक, यशराज जीवन सुतार, वेदांत नितीन ठाकूर, सिद्धार्थ गोमटा पवार, सर्वज्ञ सागर खैरनार, चैतन्य रवींद्र चौधरी.**



**१९ वर्षा आतील मुली : कॅप्टन पाटील कस्तुरी संतोष, महाजन डिंपल शिवदास, पाटील खुशी शैलेश, राजपुरोहित काजल नरेंद्रसिंग, सारगे मधुली प्रीतमकुमार, काव्या निहार देसाई, सिमरन कानसिंग राजपुरोहित, दिशा हरीश मदनी, विधी निलेश टोम्पे, पल्लवी रवींद्र तावडे, तनिष्का सुनील गुरव, ईश्वरी विलास राणे, रिद्धी शशिकांत चौधरी.**

**१९ वर्षा आतील मुले : कॅप्टन जयेश ज्ञानेश्वर पाटील, आनंद शैलेंद्र पाटील, कार्तिकभाई किशोरभाई पटेल, कौशिक महेंद्र शिवदे, जितेश बालू अहिरे, तुषार रवींद्र सूर्यवंशी, दीपक हीरालाल माळी, निखिल सोमनाथ चौधरी, पृथ्वीराज संग्राम सोमवंशी, पार्थ राजू पाटील, मानव कृष्ण सोनवणे, ऋषिकेश निलेश माली, यश विश्वनाथ चौधरी, विनय प्रल्हाद निकम, साहिल राकेश पाटील, वैभव चतुर पवार.**

या स्पर्धेसाठी मुकेशभाई पटेल मिलिटरी स्कूल, आदर्श माध्यमिक विद्यालय कळमसरे, साहेबराव सोमा पाटील माध्यमिक विद्यालय व जुनिअर कॉलेज तऱ्हाडी, हस्ती पब्लिक स्कूल दोंडाईचा व कानोसा कॉन्व्हेंट, मनपा धुळे संघ उपस्थित होते. प्रमुख अतिथींच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. या स्पर्धेमध्ये १४ वर्षे वयाखालील मुलांच्या संघात मुकेशभाई पटेल मिलिटरी स्कूलचा संघ विजयी झाला. तर हस्ती पब्लिक स्कूलचा संघ उपविजयी झाला.१४ वर्षे खालील मुलींच्या संघात मुकेशभाई पटेल मिलिटरी स्कूल विजय झाला. १९ वर्षे वयाखालील मुलांच्या संघांत मुकेशभाई पटेल मिलिटरी स्कूल तांडे संघ विजयी झाला. मुलींच्या १९ वर्षाखालील गटात मुकेशभाई पटेल मिलिटरी स्कूल तांडे संघ विजयी झाला. विजयी झालेल्या संघांची विभागीय स्तरावर होणाऱ्या स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

# नियमाचे पालन करत गणेशोत्सव साजरा करा : सहा. पोलिस आयुक्त नितीन जाधव

**पंचवटी । प्रतिनिधी**

गणेशोत्सव साजरा करत असताना तो नियमांची पायमल्ली करत साजरा होणार नाही याची काळजी घ्यावी. नियमांचे पालन करूनच गणेशोत्सव साजरा करावा असे सहाय्यक पोलीस आयुक्त नितीन जाधव यांनी प्रतिपादन केले ते पंचवटी पोलीस ठाण्यात गणेशोत्सवानिमित्त मंडळाच्या बैठकीमध्ये बोलत होते.

यावेळी पंचवटी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल शिंदे पोलीस निरीक्षक गुन्हे जितेंद्र सपकाळे पोलीस निरीक्षक प्रशासन नंदन बगाडे मनपा,विद्युत विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.तसेच शांतता समितीचे पदाधिकारी , पंचवटीतील गणेश मंडळ उत्सवाचे अध्यक्ष अधिकारी उपस्थित होते. गणेश उत्सवानिमित्त पंचवटी पोलीस ठाण्यात शनिवार (ता.०९) रोजी बैठक संपन्न झाली. यावेळी सहायक पोलिस आयुक्त नितीन जाधव म्हणाले की,मंडळाच्या ठिकाणी एक सूचना बोर्ड लावून त्यावर अध्यक्ष स्वयंसेवक यांचे नाव मोबाईल नंबर टाकावे. डीजे वाद्य वाजविल्यामुळे होणारे दुष्परिणाम, अनाधिकृत वीज कनेक्शन, प्रसाद वाटपावेळी विषबाधा होणार नाही याची दक्षता घ्यावी. फायर बाबत दक्षता, विनापरवानगी कुठल्याही प्रकारचे स्टेज मंडप कमानी टाकण्यात येऊ नये. गणेश मंडळाच्या ठिकाणी स्वयंसेवक नेमावे,जबरदस्तीने वर्गणी गोळा करू नये.तसेच पोलीस आयुक्त अंकुश शिंदे यांच्या संकल्पनेतून मंडळांकरता उत्कृष्ट देखाव्यासंदर्भाने स्पर्धेची माहिती देण्यात आली आहे.


## CHANGE NAME

MY OLD NAME WAS
SAMRUDDH ANIL SHAH
AND NEW NAME IS
SAMRUDDHA ANIL SHAH
ADDRESS - 8/A MUNCIPAL
COLONY DEVPUR DHULE



निशाणी नं.- ५२

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. (क.स्तर) यांचे कोर्टात**

रे.मु. नं. ४४/२०२२

जेठु गोबजी वाडीले (भोई) (मयत)
वगैरे - २.४ .....वादी
वि.
श्री. उखाजी कुष्णा भोई (ढोले)
वगैरे - १ .....प्रतिवादी

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी वादी यांनी या प्रतिवादी नं. १ उखाजी कृष्णा भोई (ढोले) यांचे विरूदध वादी यांनी **दावा डिक्लेरेशन व कायमचा मनाईहुकूमासाठी** दाखल केलेला आहे.

त्याअर्थी प्रस्तुत अर्जाचे कामी कोणास जी काही हरकत घ्यावयाची असेल त्यांनी धुळे येथील ९ वे सहदिवाणी न्यायाधिश क. स्तर या कोर्टात दि.०६/१०/२०२३ रोजी सकाळी १०.३० वा. उपनिर्दिष्ट कोर्टात आपण स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून लेखी हरकत घ्यावी. मुदतीत जर कोणाची काहीही हरकत आली नाही तर वरील वादी यांचे पक्षात एकतर्फी निकाल देण्यात येईल.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.०६/०९/२०२३ रोजी माझे सहिनिशी व न्यायालयाचे शिक्यानिशी दिली असे.

धुळे
दि.०६/०९/२०२३ आदेशावरुन

शिक्का

**कामगिरी कारकुन**
**दिवाणी न्यायालय, क. स्तर,धुळे**

**अधिक्षक,**
**दिवाणी न्यायालय, क. स्तर,धुळे**


# प्रशासकीय काम जलदगतीने करा : डॉ. गुंडे

### जिपत राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान बैठक

**नाशिक । प्रतिनिधी**

राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नाशिक जिल्हा परिषदेत अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.अर्जुन गुंडे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. बैठकीमध्ये जिल्हा परिषदेतील विभागप्रमुख सर्व विभागातील सहायक प्रशासन अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी यांना राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियानाच्या अंमलबजावणीसाठी सूचना देण्यात आल्या.

यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) रवींद्र परदेशी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी भालचंद्र चव्हाण, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) वर्षा फडोळ, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ.संजय शिंदे, महिला व बालकल्याण विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी दीपक चाटे, बांधकाम ३ विभागाच्या कार्यकारी अभियंता अभियंता शैलजा नलावडे, बांधकाम २ विभागाचे कार्यकारी अभियंता पंकज मेतकर यांच्यासह सहायक प्रशासन अधिकारी व कनिष्ठ प्रशासन अधिकारी उपस्थित होते.



### सुंदर माझे कार्यालय अभियानाबद्दल देखील सूचना

**कार्यालयातील वातावरण स्वच्छ, सुंदर व पोषक असल्यास त्यामुळे त्यांची कार्यक्षमता वाढून त्याचा फायदा निश्चितपणे प्रशासन आणि सामान्य जनेतला होतो. यास अनुसरून सुंदर माझे कार्यालय हे अभियान सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दि.१८ मे २०२१ च्या माध्यमातून राबवण्यात येत आहे. या अभियानाच्या तिसऱ्या टप्याची अंमलबजावणी येत्या दि. १ सप्टेंबर ते ३० नोव्हेंबर या कालावधीत केली जाणार आहे. याबद्दल जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ अर्जुन गुंडे यांनी माहिती देत राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान व सुंदर माझे कार्यालय या अभियानाची सांगड घालून काम करण्याच्या सूचना उपस्थितांना केल्या.**

बदलत्या नवीन तंत्रज्ञानामुळे व जागतिकीकरणामुळे प्रशासनामध्येसुध्दा मोठया प्रमाणावर बदल करणे गरजेचे आहे. त्यानुसार प्रशासनातील सेवांच्या गुणवत्तेमध्ये वाढ, लोकाभिमुखता व निर्णयशीलता आणण्याकरिता तसेच सर्वांच्या सहकार्यातून उत्तम प्रशासन कार्यान्वित करण्याकरिता राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान राबवले जाते. मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियानाची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्याच्या सूचना दिल्या होत्या, त्यानुषंगाने आज अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.अर्जुन गुंडे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली यावेळी त्यांनी सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय १ फेब्रुवारी २०२१ च्या अनुषंगाने राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियानाच्या कार्यपद्धतीबद्दल माहिती देऊन हे सर्व विभागांच्या माध्यमातून कसे राबवता येईल याबद्दल मार्गदर्श केले.

## न्यूज कॉलम

### गोमांसाची वाहतूक रोखण्यात यश

**धुळे ।** बेटावद - नरडाणा रस्त्यावरील (ता. शिंदखेडा) जातोडा फाट्याजवळ तवेरातून होणारी गोमांसाची बेकायदा वाहतूक नरडाणा पोलिसांनी पहाटे साडेचारच्या सुमारास उघडकीस आणली. तवेरातून (एमएच १५, सीडी ७८५८) गोमांसाची वाहतूक होत असल्याची माहिती नरडाणा पोलिसांना मिळाली. पहाटे चारच्या सुमारास जातोडा फाट्यावर पथकाने पाळत ठेवली. संशयित वाहन येताच ते पथकाने अडविले. तपासणीत ८० किलो गोमांस आढळले. या कारवाईत वाहनासह तीन लाखांवर किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी चालक महेमूद हाफिजुल पटेल, वसीम सलीम पटेल (दोघे रा. जातोडा, ता. शिंदखेडा), दाऊद समद कुरेशी (रा. बेटावद, ता. शिंदखेडा) याच्याविरुद्ध नरडाणा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

### किराणा दुकानातून पंधरा हजार लंपास

**धुळे ।** बऱ्याच शहरातील मोहाडी उपनगरातील पंजाबी कॉलनीत किराणा दुकान फोडून चोरट्यांनी पंधरा हजारांची रोकड लंपास केली. ही घटना ९ सप्टेंबरनंतर मध्यरात्री घडली. याबाबत किराणा दुकानमालक मुरलीधर श्रीपत पाटील यांनी दिलेल्या तक्रारीनुसार मोहाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. हवालदार प्रकाश लोहार तपास करीत आहेत.

# निमडाळे ते खेडे रस्ता कामाचे आ.कुणाल पाटील यांच्या हस्ते भूमीपुजन




### ८ कोटी ३३ लक्ष रु. निधीची तरतूद

**धुळे । प्रतिनिधी**

धुळे ग्रामीण विधानसभा मतदार संघात आ.कुणाल पाटील यांनी रस्त्यांच्या विकासाला नेहमीच प्राधान्य दिले आहे.त्याअनुषंगाने आ.कुणाल पाटील यांच्या हस्ते आज निमडाळे ते खेडे आणि नेर(नुरनगर)ते कावठी या रस्त्यांच्या कामाचे भूमीपूजन करण्यात आले. या दोनही कामासाठी एकूण ८ कोटी ३३ लक्ष रुपयांचा निधी मंजुर करण्यात आला आहे.

धुळे तालुक्यात चांगले व सुस्थितीत रस्त्याचे जाळे व्हावे म्हणून आ.कुणाल पाटील यांच्या प्रयत्नाने तालुक्यातील रस्त्यांच्या कामांना प्राधान्य देत निधी मंजुर करण्यात येत असतो. चांगल्या रस्त्यामुळे गावाच्या विकासाला चालना मिळते हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून आ.कुणाल पाटील यांनी रस्त्यांची कामे मंजुर केली आहेत. आज दि.१० सप्टेंबर रोजी आ.कुणाल पाटील यांच्या हस्ते प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत मंजुर करण्यात आलेल्या रस्त्यांच्या कामांचे भूमीपुजन करण्यात आले. निमडाळे ते खेडे दरम्यान ६.५० कि.मी. रस्त्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्यात येणार आहे. या कामासाठी एकूण ४१८.५० लक्ष रुपयाचा निधी मंजुर केला गेला आहे. तसेच नेर(नुरनगर) ते कावठी ५.८०कि.मी. एवढ्या लांबीच्या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण केले जाणार आहे. याकरीता एकूण ४१४.९७ लक्ष रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. या दोनही कामांचे आ.कुणाल पाटील यांच्या हस्ते भूमीपूजन करण्यात आले. या प्रसंगी बोलतांना आ.कुणाल पाटील यांनी सांगितले कि, तालुक्यात आणि जिल्हयात दुष्काळाची भीषण स्थिती असून खरीप हंगाम शेतकर्यांच्या हातून गेला आहे. त्यामुळे शासनाने २५ टक्के पिकविम्याची अग्रीम रक्कम द्यावी अन्यथा रस्त्यावर उतरुन आंदोलन केले जाईल. तसेच अक्कलपाडा प्रकल्पातून पाणी सोडून उजवा आणि डाव्या कालव्यातून शेतकर्यांना पाणी देण्यात यावे तसेच या कालव्याच्या माध्यमातून छोटे माठे पाझर तलावही भरण्यात यावे यासाठी आपण जिल्हाधिकार्यांकडे मागणी केली असल्याचे यावेळी आ.पाटील यांनी सांगितले. या कार्यक्रमाला बाजार समितीचे सभापती बाजीराव पाटील, माजी पं.स.सभापती भगवान गर्दे, जि.प.सदस्य अरुण पाटील, जि.प.सदस्य आनंद पाटील, ज्येष्ठ नेते दिलीप शिंदे, डॉ.दत्ता परदेशी,बाबाजी कृष्णा देवरे, नेर सरपंच गायत्रीताई जयस्वाल, पं.स.सदस्य मांगू मोरे, ज्येष्ठ नेते साहेबराव सोनवणे, माजी पं.स.सदस्य पंढरीनाथ पाटील, बाजार समितीचे संचालक विशाल सैंदाणे, ऋषीकेश ठाकरे, प्रकाश पाटील, सुरेश भिल,माजी संचालक राजेंद्र भदाणे,खरेदी विक्री संघाचे व्हा. चेअरमन दिनकर पाटील,संचालक बापू खैरनार, के.डी.पाटील, मेहरगाव सरपंच विजय भामरे,शोभाताई जाधव, माजी सरपंच सोमनाथ पाटील,युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष गणेश गर्दे,डॉ. विजय देवरे, दिगंबर देवरे, माजी सरपंच प्रदिप देसले, हिरामण पाटील, विवेक जाधव, जिभाऊ सखाराम पाटील, देऊर सरपंच भाऊसाहेब देवरे, अतुल देशमुख,बापू खताळ, गणेश जयस्वाल, नेर येथील योगेश गवळे, दिलीप बिरारी,सुभाष बोढरे,नाना बोढरे,शिवाजी पाटील, दिनेश पाटील, आबा पगारे, राजेंद्र पाटील, शरद सोनवणे, दिलीप सोनवणे, मुकूंद साखरे, उपसरपंच जाकीर तांबोळी, साजिद तांबोळी, गुड्डू शेख, रुबाब शेख, नारायण बोढरे, शाम जाधव, दयाराम पारधी, प्रभाकर भामरे,किरण भामरे, चंद्रकांत सुर्यवंशी, विशाल सुर्यवंशी, राजेंद्र पाटील, गुणवंत पाटील, दिगंबर परदेशी, झुलाल पाटील, भूषण पाटील यांच्यासह नेर, देऊर, शिरधाणे, खंडलाय, भदाणे, कावठी, अकलाड, मोराणे प्र.नेर, खेडे, उडाणे, गोताणे, गोंदूर, निमडाळे, कुसूंबा, वार येथील कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# कचरा फेकल्यास, कॅरिबॅग वापरल्यास दंड : उपायुक्त डॉ. संगीता नांदूरकर



**धुळे । प्रतिनिधी**

रस्त्यावर, सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकल्यास तसेच बंदी घातलेल्या प्लॅस्टिक कॅरिबॅगचा वापर केल्यास संबंधितांविरुद्ध दंडात्मक कारवाई केली जाईल, असा इशारा महापालिकेच्या उपायुक्त डॉ. संगीता नांदूरकर यांनी फेरीवाले, व्यापाऱ्यांना दिला. उपायुक्त डॉ. नांदूरकर यांनी प्रभाग क्रमांक ८ मध्ये मुख्य बाजारपेठ, पाचकंदील परिसराला भेट देत फेरीवाले, व्यापारी यांना ओला-सुका कचऱ्यासाठी स्वतंत्र दोन डस्टबिन ठेवण्याचे निर्देश दिले. तसेच आपल्या दुकानाबाहेर अथवा ज्या ठिकाणी आपण व्यवसाय करता त्या ठिकाणी डस्टबिन ठेवले नाही, रस्त्यावर अथवा सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकल्यास तसेच बंदी असलेल्या प्लॅस्टिक कॅरिबॅग वापरल्यास संबंधितांविरुद्ध घनकचरा अधिनियम-२०१६ नुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असा इशारा दिला.

दरम्यान, फेरीवाले, व्यापाऱ्यांनी पाचकंदील परिसरातील कचराकुंडी महापालिकेने बंद केल्याने आम्ही सकाळी तसेच रात्री घंटागाडीमध्येच कचरा देतो, रस्त्यावर अथवा इतरत्र फेकत नाहीत, असे सांगितले. यानिमित्ताने उपायुक्त डॉ. नांदूरकर यांनी शहरातील सर्व नागरिकांनी आपल्या घरातून निघणारा कचरा घंटागाडीतच टाकावा, तसेच ओला व सुका असे वर्गीकरण करून कचरा द्यावा, असे आवाहन केले. या पाहणीप्रसंगी मुख्य स्वच्छता निरीक्षक राजेश वसावे, स्वच्छता निरीक्षक विकास साळवे, महेंद्र ठाकरे, अतिक्रमण निर्मूलन विभागप्रमुख प्रसाद जाधव, लिपिक विजय गोसावी, मुकादम अनिल जावडेकर, कैलास पाटील, घनकचरा संकलन सुपरवायझर नरेश वानखेडे, स्वयंभू ट्रान्स्पोर्टचे प्रतिनिधी आदी उपस्थित होते.

# पीएम स्कील रन मॅरेथॉन स्पर्धेंचे आयोजन

**धुळे ।** व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई तसेच शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था,धुळे यांच्यावतीने धुळे शहरातील शासकीय, खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तसेच शासकीय तांत्रिक विद्यालयामध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांसाठी पीएम स्कील रन मॅरेथॉन स्पर्धांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य रा.सु.मानकर यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे. ही पीएम स्कील रन मॅरेथॉन स्पर्धा रविवार १७ सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी ७ वाजता औद्योगिक प्रशिक्षण संस्था,धुळे येथून सुरु करण्यात येईल.

# विसपूते माध्यमिक विद्यालयात पर्यावरण पूरक गणपती बनविण्याची कार्यशाळा संपन्न



**धुळे । प्रतिनिधी**

शहरातील बापूसाहेब डी. डी. विसपुते माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांमध्ये शाळेतील मुलांसाठी पर्यावरण पूरक गणेश मूर्ती बनवण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यावेळी सुप्रसिद्ध मुर्तिकार मा. विजय चित्ते यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांना शालेय जीवनात विविध उपक्रमांच्या माध्यमातून सुसंस्कारित केले जात असते. या कार्यशाळेतून पर्यावरण संवर्धन करण्याची जबाबदारी, गरज व महत्व यासंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यशाळेला संस्थेच्या सचिव मा. स्मिताताई विसपुते यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. शाडू माती पासून मूर्ती कशी तयार करावी हे प्रात्यक्षिकाद्वारे श्री विजय चित्ते यांनी करून दाखवले. प्लॅस्टर ऑफ पॅरिस पासून प्रदूषण होत असते आणि त्यामूळे पाण्यातील जीवांना होणारा त्रास व प्रदुषणाचे धोके इ. विषयांवर मुलांना मार्गदर्शन केले. यावेळी सर्व विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. स्मिताताई विसपूते यांनी गणेशोत्सवात मोठ्या प्रमाणात ध्वनी व जल प्रदूषण होत असल्याने हा उत्सव पर्यावरण पूरक म्हणून साजरा करण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करण्याची गरज व्यक्त केली. शाडू मातीपासून तयार केलेल्या मूर्तीची स्थापना केली तर जलप्रदूषण कमी होण्यास मदत होईल असेही त्यांनी नमूद केले. तसेच प्रत्येक विद्यार्थ्यांनी यावेळी मुर्ती बनविताना एक बी त्यामध्ये टाकली गणपती विसर्जन केल्यानंतर त्या तयार होणाऱ्या रोपाचे संवर्धन करण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी केला.

कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी श्री एस. आर. पाटील, श्री डी. डी. पवार, श्री ए. के. पाटील, श्री एस. बी. भदाणे, श्री विजय देसले, श्रीमती अपर्णा पाटील, श्री महेंद्र बाविस्कर, श्री योगेंद्र पाटील, महेश पाटील, श्रीमती राजश्री मासूळे, श्री कुणाल साळूंके, श्री जयेश गाळणकर, श्री तुषार कुलकर्णी, श्री अभिज्ञ पवार, महेश पवार व विलास भामरे यांनी मेहनत घेतली. यासाठी संस्थेचे अध्यक्ष मा. नानासाहेब महेंद्रजी विसपुते, संस्थेच्या सचिव स्मिताताई विसपुते, प्राचार्य श्री पी. बी. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

# जखाणे येथील प्रा.महेंद्र बच्छाव नेशन बिल्डर अवॉर्ड ने सन्मानित




**चिमठाणे । शिंदखेडा**

तालुक्यातील जखाणे येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील प्राध्यापक महेंद्र सुभाष बच्छाव यांना उत्कृष्ट शैक्षणिक व विद्यार्थ्यांसाठी विविध राबविलेल्या उपक्रमासाठी तसेच अंशतः अनुदानित शिक्षकांसाठी अहोरात्र लढ्यातील कामगिरीची दखल घेत शिक्षक दिनानिमित्त रोटरी क्लब ऑफ धुळे यांच्यावतीने राष्ट्र निर्माता नेशन बिल्डर अवॉर्ड हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

यावेळी सुप्रसिद्ध वक्ते, नामांकित सी.ए. प्रा.प्रकाश पाठक, राहुल देवरे, रोटरी क्लबचे अध्यक्ष दिपक जैन, रोटरी क्लब साक्षरता प्रमुख डॉ. जगदीश गिंदोडिया, कार्यक्रम सल्लागार रोहित अग्रवाल, गंधारचे गजेंद्र पाटील,रोटरी क्लबचे सचिव विलास कोठावदे, प्राचार्य पी.बी.पाटील उपस्थित होते. या सन्मानाबद्दल संस्थेचे अध्यक्ष शशिकांत पाटील, सचिव/प्राचार्या एस.एस पाटील, संस्थेचे खजिनदार व्ही.जी.शिंदे, श्रीमती एस.डी.भामरे, श्रीमती एम.डी. सैंदाणे, व्ही.एल. सोनवणे, डी.बी.सोनवणे, के.व्ही.देवरे, व्ही.बी. कंखर, वाय.बी. पाटील, भुषण एस.पाटील के. व्ही.बच्छाव, एन.के.वाघ यांनी कौतुक करीत शूभेच्छा दिल्या. शिक्षक समन्वय संघ महाराष्ट्र राज्य, उच्च माध्यमिक/क.म.वि.शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचारी संघटना महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने अभिनंदन केले जात आहे.

# कौशल्य विकास व रोजगार व उद्योजकता विभागामार्फत आज रोजगार मेळावा

**धुळे । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील युवक-युवतींना विविध खासगी कंपन्या, कारखाने, उद्योग-व्यवसाय आणि आस्थापना यांचेकडील रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याच्या उद्देशाने प्रत्येक गुरुवारी थेट नियुक्तीसाठी रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती कौशल्य विकास रोजगार व उद्योजकताचे सहायक आयुक्त राजू वाकुडे यांनी शासकीय प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, धुळे ,मॉडेल करिअर सेंटर (एनसीएस) आणि बापूसाहेब शिवाजीराव देवरे कॉलेज ऑफ इंजिनीअरींग कॉलेज,धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने येथे बापूसाहेब शिवाजीराव देवरे कॉलेज ऑफ इंजिनीअरींग (एसएसव्हीपीएस) ,धुळे येथे गुरुवार, दिनांक १४ सप्टेंबर, २०२३ रोजी सकाळी १० ते २ वाजेपर्यंत रोजगार मेळावा (प्लेसमेंटचे) आयोजित केले आहे.

यासाठी मॅक्रॉन सर्व्हिसेस प्रा.लिमिटेड,पुणे अंतर्गत बजाज ऑटो लिमिटेड या कंपनीमध्ये विविध पदासाठी अशी एकूण ४०० रिक्तपदे प्राप्त झालेली आहेत. याकरीता नोकरी इच्छुक पात्रताधारक उमेदवारांची प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात येवून जागेवरच निवड करण्यात येणार आहे.

धुळे जिल्ह्यातील नोकरी इच्छुकांनी या संधीचा लाभ घ्यावा. तसेच अधिक माहितीसाठी विभागाच्या ृ.ेक्षसरी.ारहरीुरूरा.सीं.ळप तसेच ृ.पली.सीं.ळप या वेबसाईटला भेट द्यावी. यापूर्वी नोंदणी केली नसल्यास प्रथम आपली नोंदणी करावी आणि होम पेज वरील नोकरी साधक (जॉब सिकर) लॉगिन मधून आपल्या युजर आयडी व पासवर्डच्या आधारे लॉगिन करावे. त्यानंतर डॅशबोर्ड मधील पंडित दीनदयाळ उपाध्याय जॉब फेअर या बटनावर क्लिक करून धुळे जिल्हा निवडून त्यातील प्लेसमेंट ड्रॉईव्ह-७ पर्याय (२०२३-२०२४) धुळे यांची निवड करावी. उद्योजक, नियोक्तानिहाय त्यांच्याकडील रिक्त पदांची माहिती घ्यावी. अधिक माहितीसाठी ृ.ेक्षसरी.ारहरीुरूरा.सीं.ळप संकेतस्थळासंबंधी संदिप बोरसे ९८२२२९९८४४ तसेच ृ.पली.सीं.ळप संकेतस्थळासंबंधी मुकेश बोरसे ८६००३०३४८७ तर वर संपर्क साधावा. तसेच ऑनलाईन सेवा घेतांना लाभार्थी घटकांना येणाऱ्या अडचणीचे निराकरण करण्यासाठी मुख्यमंत्री हेल्पलाईन अंतर्गत हेल्पलाईन सुरु करण्यात आली आहे. या हेल्पलाईनचा टोल फ्रि क्रमांक १८००१२०८०४० असा आहे.हेल्पलाईनची ची वेळ सकाळी ८ ते रात्री ८ वाजेपर्यंत उपलब्ध आहे. याप्रमाणे आवश्यक किमान पात्रता धारण करीत असल्याची खात्री करून उपलब्ध असलेल्या रिक्त पदासाठी ऑनलाईन पद्धतीने आपला पसंती क्रमांक नोंदवावा आणि किमान दोन प्रतीत बायोडाटासह फोटो आणि आधारकार्ड, सेवायोजन नोंदणी कार्ड, शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, इ. कागदपत्रे कंपनींना देण्यासाठी छायाप्रती संच सोबत ठेवून गुरुवार, दिनांक १४ सप्टेंबर, २०२३ रोजी सकाळी १० ते २ वाजेपर्यंत प्रत्यक्ष मुलाखतीसाठी शिवाजीराव देवरे इंजिनीअरींग कॉलेज (एसएसव्हीपीएस) ,धुळे येथे उपस्थित राहावे. असे आवाहन कौशल्य विकास रोजगार व उद्योजकताचे सहायक आयुक्त श्री. वाकुडे यांनी केले आहे.



# शिरपूर पिपल्स को-ऑप बँकेतर्फे सभासदांना १० टक्के दराने लाभांश : भंडारी

**शिरपूर । प्रतिनिधी**

शिरपूर पिपल्स को-ऑप बँकेतर्फे सर्व सभासदांना १० टक्के दराने लाभांश जाहीर करत आहोत. बँकेतर्फे सभासद, ग्राहक, ठेवीदार यांना अत्याधुनिक सुविधा पुरविल्या जात असून लवकरच सर्वांना विविध डिजिटल सेवांचा लाभ मिळणार आहे असे प्रतिपादन बँकेचे अध्यक्ष योगेश भंडारी यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेत केले.

दि शिरपूर पिपल्स को-ऑप बँक लि. शिरपूर या बँकेची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा एस.एम.पटेल ऑडोटोरियम हॉल, शिरपूर येथे बँकेचे अध्यक्ष योगेश भंडारी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. वार्षिक सर्वसाधारण सभेच्या



सुरुवातीला आर्थिक वर्षात राष्ट्रीय नेते, समाजसेवक, सभासद, खातेदार, शहीद जवान, हितचिंतक व बँकेचे संचालक ॲड. रमेशचंद्र गुजराथी व नंदुभाऊ ठाकरे यांना श्रद्धांजली वाहून सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

बँकेने गेल्या आर्थिक वर्षात केलेल्या प्रगतीचा आढावा घेण्यात येवून ताळेबंद व नफातोटा पत्रक वाचून दाखविण्यात आले. मार्च २०२३ अखेर बँकेच्या ठेवी ४६०.२९ कोटी रुपये, कर्जवाटप २७२.३४ कोटी, गुंतवणूक २१६.७० कोटी असून बँकेने नेट एन.पी.ए. चे प्रमाण शून्य टक्के राखलेले आहे. बँकेस ५.६३ कोटी रुपये नफा झाला असून, १० टक्के दराने लाभांश जाहीर करण्यात आला.

आधुनिक तंत्रज्ञानाने समृद्ध आणि सक्षम बँक बनवत असताना संवेदनेसह सामान्य माणसाच्या हितासाठी काम करून ग्रामीण व निमशहरी भागात ग्राहकांना आकर्षित करून आपला पाया विस्तारण्याचा नवनिर्वाचित संचालक मंडळाने निर्धार व्यक्त केला आहे. सध्याचे बँकिंग क्षेत्रातील स्पर्धात्मक परिस्थितीतही आपल्या बँकेने ७३२.५६ कोटीचा व्यवसाय आर्थिक वर्षात केलेला आहे. बँकेच्या कोअर बँकिंग प्रणालीचे अपग्रेडेशनचे काम पूर्ण झालेले आहे. डिजिटल टेक्नॉलॉजी हा बँकेचा अविभाज्य भाग असून एटीएम, पॉस झजड, मोबाईल बँकिंग सुविधा ग्राहकांना देत आहेत व लवकरच युपीआय णझख सुविधा व नेटबँकिंग बँकेमार्फत सुरु होणार आहे. बँकेने कर्जावरील व्याजदर बरेच कमी केले असून सभासद, व्यापारी व गरजू व्यक्तींनी बँकेकडून जास्तीत जास्त प्रमाणात कर्ज घेणेबाबत आवाहन केले आहे. बँकेकडून स्वस्त, सुलभ व तत्पर कर्ज उपलब्ध आहे. बँकेने बँकिंग सेवेबरोबर सामाजिक बांधिलकी जोपासून सभासदांना अनेक आरोग्य सेवा, शिरपूर येथील अमरधाम मध्ये लाकूड पुरविणे, प्रधानमंत्री जीवन ज्योती योजनेंतर्गत ५ खातेदारांना रु. १० लाखाचा लाभ मिळवून दिला आहे. तसेच बँकेच्या सभासदांसाठी सुरु असलेल्या कल्याणकारी योजनेंतर्गत सभासदांना प्रचलित मृत्युंजय योजनेत बदल केला असून त्यामध्ये मयत सभासदाचे असलेले भाग भांडवल रकमेच्या दुप्पट लाभ वारसास दिले जाईल असे बँकेचे अध्यक्ष योगेश भंडारी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले.

# विश्व मानव रुहाणी केंद्र दहिवदतर्फे एकूण २१६ रुग्णांची तपासणी

**शिरपूर । प्रतिनिधी**

विश्व मानव रुहाणी केंद्र दहिवद तर्फे होळनांथे वस्ती भागात मोफत आरोग्य तपासणी शिबिरात १० सप्टेंबर रविवार रोजी एकूण २१६ रुग्णांची तपासणी करण्यात आली.

विश्व मानव रुहाणी केंद्र ही (नोंदणीकृत) परोपकारी व आध्यात्मिक संस्था आहे. ही संस्था संत बलजीतसिहजी महाराज यांनी शिकवलेले नैतिक जीवन, अध्यात्म व ध्यान धारणा यावर आधारित कार्यक्रम तसेच लोककल्याणासाठी विविध प्रकारच्या सामाजिक कार्याचे आयोजन करते. होळ वस्ती भागात मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात येऊन शिबिरात एकूण २१६ रुग्णांची तपासणी करून त्यांना डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार मोफत औषधी देण्यात आली.

या प्रसंगी जि. प. सदस्य संजय संतोष पाटील, सरपंच श्रीमती शकूरबाई सजन बैसाणे, उपसरपंच श्रीमती खटाबाई वासुदेव गुजर, लिपीक दिनकर कृष्णा चौधरी, पो.पाटील वासुदेव चिंधूजी निकम, ग्रा. पं. सदस्य दादूसिंग राजपूत, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कर्मचारी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनी या समाज सेवेच्या कार्या बद्दल आनंद व्यक्त केला. या कामी डॉ. निनाद हर्षद शाह (एम. डी. मेडिसिन) यांनी आरोग्य निदान केले.

CMYK

दैनिक

# लक्ष महाराष्ट्र




गुरुवार, दि. १४ सप्टेंबर २०२३



# भाजपा लोकशाहीचा गळा घोटत आहे : आ.थोरात

## काँग्रेसच्या जनसंवाद यात्रेचा धुळ्यात बाळासाहेब थोरांताच्या उपस्थितीत समारोप





















धुळे। यंदाच्या धुळे जिल्हयासह महाराष्ट्रात भीषण दुष्काळाची स्थिती असतांना केंद्राचे आणि राज्याचे सरकार सत्तेच्या राजकारणात गुंग आहे. सरकारने दुष्काळ जाहिर करुन शेतकर्यांच्या खात्यात २५ टक्के विम्याची अग्रीम रक्कम तत्काळ जमा करावी अन्यथा महाराष्ट्रभर आंदोलन केले जाईल असा इशारा काँग्रेसचे महाराष्ट्र विधी मंडळाचे नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी दिला.दरम्यान राज्यघटनेवर आघात केला जात असून लोकशाहीचा गळा घोटण्याचे काम भाजपा सरकार करीत असल्याचा घणाघातही यावेळी आ.थोरात यांनी यावेळी केला.धुळे जिल्हयातील काँग्रेसच्या जनसंवाद यात्रेच्या समारोप सभेप्रसंगी ते बोलत होते. काँग्रेस पक्षार्फे राज्यात दि.३ सप्टेंबरपासून जनसंवाद पदयात्रा काढण्यात आली. या यात्रेचा धुळे जिल्हयाच्या समारोप महाराष्ट्र विधीमंडळाचे नेते माजी मंत्री आ.बाळासाहेब थोरात यांच्या अध्यक्षतेखाली दि.१३ सप्टेंबर रोजी दुलारी गार्डन नकाणे,धुळे येथे करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र काँग्रेसचे कार्याध्यक्ष आ.कुणाल पाटील, प्रदेश सरचिटणीस शरद आहेर, ज्येष्ठ पत्रकार निरंजन टकले, अश्विनी पाटील,माजी खा.बापू चौरे, माजी आ.वसंतराव सुर्यवंशी,काँग्रेस जिल्हाध्यक्ष शामकांत सनेर,शहराध्यक्ष डॉ.अनिल भामरे,प्रदेश सचिव युवराज करनकाळ हे उपस्थित होते. सभेत समारोपाप्रसंगी उपस्थित जनसमुदायापुढे बोलतांना विधीमंडळ नेते आ.बाळासाहेब थोरात यांनी भाजपाच्या धोरणांवर सडकून टीका केली.

संकलन : दिपक वाघ



CMYK

दैनिक
लक्ष महाराष्ट्र





# पंचायत समितीत सरपंच संघटनेचे लक्षवेधी आंदोलन

## वाजा वाजवून झोपलेल्या प्रशासनाला जागे करण्याचा प्रयत्न













धुळे । सिंचन विहिरी, गाय गोठे, पंतप्रधान योजनेंतर्गत ड यादीला मंजुरी द्या, अन्यथा पंचायत समिती बंद करा, अशी मागणी करत अखिल भारतीय सरपंच परिषदेतर्फे लक्षवेधी आंदोलन करण्यात आले. यावेळी वाजा वाजवून झोपलेल्या प्रशासनाला जागे करण्याचा प्रयत्न यावेळी करण्यात आला. याबाबत सरपंच संघटनेचे तालुका अध्यक्ष राजेश पाटील यांनी सांगितले की, पंचायत समिती गेल्या चार वर्षांपासून रोजगार हमी योजनेंतर्गत सिंचन विहीर, गाय, गोठ्यांना मंजुरी देत नसल्याचे चित्र आहे. तसेच पंतप्रधान योजनेंतर्गत ड यादीतील घरकुलांनाही दोन वर्षांपासून मंजुरी देत नसल्याने अल्पभुधारक शेतकरी व घरकुलाचे लाभार्थी सदर योजनेपासून वंचित आहेत. अधिकार्यांनी शेतकर्यांच्या जिवनाशी खेळू नये. यासंदर्भात पालकमंत्री गिरीष महाजन यांनाही निवेदन दिले होते. परंतु, त्यांनी कोणतीही दखल घेतली नाही. तरी सदर सिंचन विहिरी, गाय गोठे व पंतप्रधान योजनेंतर्गत ड यादीतील लाभार्थी व शेतकरी यांना लाभ देण्याची कार्यवाही करावी, अन्यथा तीव्र बेमुदत उपोषण करण्यात येईल, असा इशाराही राजेश पाटील यांनी यावेळी दिला. याप्रसंगी राजेश पाटील यांच्यासह तालुक्यातील सरपंच रेखा पाटील, पृथ्वीराज पाटील, प्रकाश कोळी, मनिषा खैरनार, सुधाकर सौंदाणे, महादू राजपूत, सुरेखा जाधव, भाऊसाहेब देवरे, रतन बागुल, निलेश माळी, चेतन शिंदे, गोविंदा पाटील, सीमा जाधव, श्रीराम पाटील, किशोर पाटील, अजय माळी आदी उपस्थित होते.

संकलन : दिपक वाघ